# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | १९९८ |
| वर्ष | : | दुसरे |
| अंक | : | ७ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |


**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : १७**

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा



वर्ष दुसरे / अंक ७ / जानेवारी १९९८

## संपादकीय

### डॉली नंतर पॉली, पॉली नंतर ...?

'डॉली' ला जन्म देणाऱ्या स्कॉटलंड (U.K.) च्या 'रोझलीन' इन्स्टिट्यूट मधील वैज्ञानिकांनी 'पॉली' या नव्या मेंढीला जन्म देऊन पुन्हा एकदा वैज्ञानिक जगतात खळबळ माजवून दिली. पॉली करता वापरले गेलेले तंत्रज्ञान हे डॉलीला जन्माला घालणाऱ्या 'क्लोनिंग' या पद्धतीचेच आहे. १९ डिसेंबर १९९७ च्या अमेरिकेहून प्रकाशित होणाऱ्या 'सायन्स' ह्या संशोधनपत्रिकेत पॉलीच्या जन्मासंबंधीचा शोधनिबंध सादर करण्यात आला आहे. पॉली ही साधी मेंढी नसून ट्रान्सजेनिक आणि न्यूक्लियर ट्रान्स्फर या जैव तंत्रज्ञानाचा वापर करून या मेंढीची निर्मिती करण्यात आली आहे. विशिष्ट मानवी जीन्सचे रोपण या मेंढीच्या निर्मितीला कारणीभूत असलेल्या गर्भपेशींमध्ये करून क्लोनिंग पद्धतीनी ही मेंढी तयार करण्यात आली.

माणसाला जखम किंवा इजा झाली की त्यातून होणारा रक्तस्राव काही वेळानंतर आपोआप थांबतो. रक्तामध्ये असलेल्या विशिष्ट घटकांमुळे रक्त गोठण्याचे हे काम होते. परंतु काही व्यक्तींच्या रक्तामध्ये या घटकांचा अभाव असतो आणि म्हणून त्यांच्या जखमेतून होणारा रक्तस्राव थांबत नाही. हिमोफिलिया हा अशा पैकीच एक रोग आहे. हिमोफिलियाच्या एका प्रकारामध्ये, रक्तामध्ये 'फॅक्टर IX' चा अभाव असतो. या रोगाला 'ख्रिसमसरोग' म्हणतात. अशा रुग्णांना वारंवार निरोगी व्यक्तींचे रक्त द्यावे लागते. यामुळे हा घटक रुग्णाला तत्परतेने आणि मुबलकतेने उपलब्ध करून देता येत नाही. 'पॉली' या मेंढीच्या दुधामध्ये माणसाला ख्रिसमस रोग व्हायला कारणीभूत असलेला घटक IX निर्माण होतो. साहजिकच अशा प्रकारे या घटकाची निर्मिती फार मोठ्या प्रमाणात करून रुग्णांना त्याची उपलब्धता कमी किमतीत आणि इतर कुठल्याही औषधाप्रमाणे सहजपणे करून देता येईल. तसेच रक्तामुळे प्रसारित होणारे एड्स, हिपॅटायटिस 'ब' किंवा 'क' मुळे होणारी कावीळ इ. रोगांपासून रुग्णांचे संरक्षण होऊ शकेल.

या जैवयांत्रिकीचा वापर करून, माणसाच्या अनेक असाध्य रोगांवर औषधे आणि उपचार मिळण्याची शक्यता यामुळे निर्माण झाली आहे.

'पॉली'च्या जन्मासंबंधीचा शोधनिबंध जरी डिसेंबर १९९७ मध्ये प्रकाशित झाला असला तरी 'रोझलीन' इन्स्टिट्यूटने 'पॉली'च्या जन्माची माहिती १७ जुलै १९९७ लाच प्रसारित केली होती. म्हणजे 'पॉली' चा जन्म 'डॉली' नंतर अवघ्या ५ महिन्यांनी झाला. या क्षेत्रामध्ये असलेली स्पर्धा आणि प्रयोगाची गती किती झपाट्याने वाढत आहे याचेच हे द्योतक आहे. 'न्यू सायन्टिस्ट' या इंग्लंडमधून प्रसारित होणाऱ्या विज्ञानमासिकाने आपल्या १९ जुलैच्या अंकामध्ये मानवी गर्भपेशींच्या विकासाची प्रक्रिया यशस्वी झाल्याचा लेख छापला. अमेरिकेतील 'बाल्टिमोर' या शहरातील 'जॉन हॉपकिन्स' या विद्यापीठाच्या प्राध्यापक 'गीअर हार्ट' यांनी हे संशोधन करून यशस्वीरित्या प्रयोगशाळेत अशा पेशींची वाढ करून दाखविली. यापाठोपाठच 'बाथ' विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी जैवयांत्रिकीचा वापर करून डोके नसलेला बेडूक तयार करता येईल असा बेडकाचा गर्भ तयार केल्याची घोषणा, ऑक्टोबर १९९७ च्या तिसऱ्या आठवड्यात केली. या संशोधनामुळे फार मोठ्या प्रमाणावर अवयव निर्माण करण्याची शक्यता निर्माण झाली.

गेल्या ४० वर्षात जैवयांत्रिकीने केलेला विकास हा मेंदू बधीर करून टाकणारा आहे. या सर्व संशोधनाचा संबंध प्रत्यक्ष मानव

(मुखपृष्ठ २ वर)

निर्मितीशी आहे. १९ व्या शतकामध्ये मेंडेल व डार्विन यांचे संशोधन निसर्गरचनेच्या निरीक्षणावर आधारित होते. मेंडेल यांनी आनुवंशिकता नव्याने निर्माण केली नव्हती, तर आपल्या प्रयोगांमधून जीवसृष्टीमध्ये दिसणाऱ्या आनुवंशिकतेमागची रचना त्यांनी लोकांपुढे मांडली होती. डार्विन यांचे संशोधन सुद्धा त्यांच्या निरीक्षणातून प्राण्यांच्या विकास आणि विविधता यांच्या पाठीशी असलेले नैसर्गिक सूत्र सांगण्याचा होता. मेंडेल किंवा डार्विन यांनी नवीन काहीच निर्माण केले नव्हते. पण सृष्टीमध्ये अस्तित्वात असलेली काही कोडी उलगडण्याचा प्रयत्न केला होता. २० व्या शतकाच्या मध्यानंतर जीवशास्त्रामध्ये झालेले संशोधन आणि प्रयोग हे यापेक्षा खूप वेगळे आहेत. १९५२ साली वॅटसन आणि क्रिक या संशोधकांनी 'डीएनए' (DNA) च्या रचनेचा शोधनिबंध सादर केल्यावर एखादे धरण फुटावे तसे हे प्रयोग आणि संशोधन होऊ लागले. आजचे जैवयांत्रिकीचे प्रयोग हे नुसते सृष्टीचे किंवा जीवाचे कोडे उलगडण्यापुरते सीमित नसून प्रत्यक्ष जीवनिर्मितीमध्ये हस्तक्षेप करणारे आहेत. प्रथम हे प्रयोग प्राण्यांवरती करण्यात आले, नंतर हेच प्रयोग वनस्पतींवर होऊ लागले. या प्रयोगांमधून मिळणाऱ्या अनुभवांतून शास्त्रज्ञ मानवी पेशींवर प्रयोग करू लागले. आणि जे प्रयोग प्राण्यांमध्ये यशस्वी होत होते तेच प्रयोग मानवांमध्ये करण्याची प्रवृत्ती बळावू लागली. कृत्रिम गर्भधारणेतून गाई आणि इतर प्राण्यांची पैदास मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाल्यावर मानवावरही हे प्रयोग होऊ लागले. मूल न होऊ शकणारी दाम्पत्ये जगामध्ये अनेक आहेत. याची कारणेही अनेक आहेत. परंतु कृत्रिम गर्भधारणेमुळे या अनेक कारणांवर मात करून या दाम्पत्यांना मुले होणे शक्य झाले. कृत्रिम गर्भधारणेतून 'लुई ब्राऊन' ही मुलगी १९७८ मध्ये इंग्लंडमध्ये जन्माला आली. डॉ. पॅट्रीक्स स्टेप्टो आणि डॉ. एडवर्ड यांनी बरीच वर्षे प्रयत्न करून हे यश मिळवले होते. अवघ्या ४ वर्षांमध्ये या तंत्रज्ञानामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर विकास झाला की याच डॉक्टरांनी १९८२ पर्यंत अशा १०० मुलांना जन्म मिळवून दिला. १९८८ साली १,००० पर्यंत अशी मुले जन्माला आली. हेच प्रयोग जगभर होऊ लागले आणि आज अक्षरशः हजारो मुले या तंत्रज्ञानातून जन्माला आलेली आहेत. अर्थातच यामुळे अनेक कायदेशीर, सांस्कृतिक आणि मानवी नीतिमूल्यांचे प्रश्न उभे राहिले. कृत्रिम गर्भधारणेतून निर्माण झालेल्या गर्भावर संशोधन करण्याचा कालावधी १४ दिवसांपर्यंतच मर्यादित करण्यात आला. आणि १४ दिवसांपेक्षा मोठ्या असलेल्या गर्भांवरती प्रयोगशाळेत प्रयोग करण्याकरिता जवळ जवळ सर्व जगभर बंदी पाळण्यात आली. आजही या अशा प्रयोगांमुळे निर्माण झालेल्या सांस्कृतिक प्रश्नांना समाधानकारक उत्तरे मिळालेली नाहीत. कायद्यातल्या अनेक पळवाटा शोधून अशा प्रयोगांचे दुरुपयोग आणि व्यापारीकरण करण्याचे प्रयत्न जगात मोठ्या प्रमाणावर चालू आहेत.

'क्लोनिंग' करता एका पेशीचे केंद्र काढून ते दुसऱ्या पेशीमध्ये रोपण करणे (Nuclear Transfer) महत्त्वाचे असते. आणि असे प्रयोग सुद्धा गेली ४० वर्षे संशोधक सातत्याने करीत आहेत. १९५२ साली बेडकांच्या पेशी आणि गर्भांवर असे प्रयोग प्रथम करण्यात आले. उंदरावर हा प्रयोग १९७७ साली माफक प्रमाणावर यशस्वी झाला. १९८० सालापर्यंत या तंत्रज्ञानातून अनेक प्राणीही निर्माण करण्यात आले. पुढे 'डीएनए' च्या घटकांची पेशीबाहेर जुळणी करणे शास्त्रज्ञांना शक्य झाले. यामध्ये कुठल्याही दोन वेगळ्या गटातील प्राण्यांच्या 'डीएनए' चे तुकडे पेशीबाहेर जुळणी करून पुन्हा त्यांचे पेशींमध्ये किंवा रंगसूत्रामध्ये रोपण करता येऊ लागले. याला 'रिकॉम्बिनण्ट डीएनए' तंत्र म्हणतात. (Recombinant DNA ) पुढे काही जीन्स पेशींमधून वेगळे करून त्यांचे रोपण गर्भपेशींमध्ये करता येऊ लागले. त्यामुळे शास्त्रज्ञांना हव्या असणाऱ्या गुणधर्मांच्या 'जीन्स' चे रोपण करून प्राणी तयार करता येऊ लागले. आता तर मानवी 'जीन्स' येही अशाप्रकारे रोपण करून प्रयोगशाळेतही प्राणी तयार करता येऊ लागले. थोडक्यात, जीवनिर्मितीमध्ये आता संशोधक हस्तक्षेप करून प्राण्यांची निर्मिती करण्यात यशस्वी झाले आहेत. 'डॉली' ची निर्मिती ही या तंत्रज्ञानापेक्षा थोडीशी भिन्न आहे. 'डॉली' करता संपूर्ण विकसित अवयवांच्या पेशींमधील पेशीकेंद्र वापरण्यात आले आहे. या तंत्रज्ञानामुळे मानवाला अपाय किती आणि उपाय किती याचा अंदाज बांधता येणे कठीण आहे. उपयुक्ततेबद्दल फारसा वाद नाही, पण उपयुक्ततेच्या आवरणाखाली दुरुपयोग आणि व्यापारीकरण यांचीच विचारवंतांना भीती वाटते. आणि म्हणूनच 'क्लोनिंग' तंत्रज्ञानाचा वापर मानवी पेशींवर होऊ नये किंवा त्यावर बंदी टाकावी असा मतप्रवाह जगामध्ये प्रभावी दिसतो. या सर्वच सांस्कृतिक धक्क्यातून बाहेर पडण्याआधीच या महिन्याच्या सुरुवातीला म्हणजे ६ जानेवारी १९९८ ला 'रिचर्ड सीड' (Richard Seed) या शिकागो येथील संशोधकांनी सर्व बंधनांना झुगारून देऊन आपण मानवी क्लोनिंगचे प्रयोग करणार असल्याचे जाहीर केले. डॉ. सीड यांच्या घोषणेच्या धक्क्यातून जग अजून सावरलेले नाही. म्हणूनच 'डॉलीनंतर कोण?' या प्रश्नाचे उत्तरही आज देता येणार नाही.

• • •




विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक


# दिशा


वर्ष दुसरे/ अंक ७/ जानेवारी १९९८

**संपादक**
डॉ. विजय वा. बेडेकर

**सहसंपादक**
श्री. प्रकाश ल. वैद्य

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ,
डॉ. बेडेकर विद्यामंदिर,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

**वार्षिक देणगी**
रु. २०० / -

**मुद्रक :**
परफेक्ट प्रिन्टर्स,
२२, ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट,
नूरीबाबा दर्गा रोड,
ठाणे - ४०० ६०१.


## *अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय वा. बेडेकर | मुखपृष्ठ |
| २) | सुभाषित | प्रा.(डॉ) मोरेश्वर दि. पराडकर | ३ |
| ३) | भारतीय धर्म आणि तत्त्वज्ञान | प्रा.(डॉ) मोरेश्वर दि. पराडकर | ५ |
| ४) | भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (१६) उत्तर भारतीय देवालयांचे मंडप | डॉ. र. पु. कुलकर्णी | १६ |
| ५) | अतींद्रिय शक्तीचे भय, कोणास वाटते का ? | श्री. व. वि. अकोलकर | २३ |
| ६) | दखल घ्यावी असा, असाही एक विषय | प्रा. मोहन पाठक | २७ |
| ७) | परिसर वार्ता | प्रा. मोहन पाठक | २९ |
| ८) | बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषदेचे ठाण्यात झालेले अविस्मरणीय अधिवेशन | प्रा. मोहन पाठक | ३५ |
| ९) | पर्यावरण | | ३९ |

# लेखक - परिचय

१. **डॉ. विजय वा. बेडेकर**

वैद्यक व्यावसायिक, अनेक शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक संस्था आणि चळवळींशी निगडित, अध्यक्ष - प्राच्यविद्या अभ्यास संस्था, भारत सहकारी बँक, सत्य शोध संस्था; अनेक परिसंवादांचे संयोजन, संशोधनपर लिखाण, *शोध अंधश्रध्देचा* या पुस्तकाचे लेखक.

२. **प्रा. (डॉ) मोरेश्वर दि. पराडकर**

संस्कृत आणि हिंदी भाषेचे पंडित, अनेक वर्षे संस्कृतचे अध्यापन; आणि प्राचार्य म्हणून पेंढारकर कॉलेज, डोंबिवली मधूननिवृत्त. बंबई हिंदी विद्यापीठाचे मानद कुलपती; संस्कृत,इंग्रजी, हिंदी आणि मराठी मधून विपुल संशोधनपर लिखाण. *स्तबक* या पुस्तकाचे लेखक.

३. **श्री. रघुनाथ पु. कुलकर्णी**

अभियंता म्हणून शासकीय सेवेतून निवृत्त. प्राचीन भारतीय शिल्पशास्त्राचा विशेष अभ्यास व संशोधन. अभियांत्रिकी संशोधन पत्रिकांतून अनेक संशोधनपर लेख प्रसिद्ध. *काश्यपसंहिता* या शिल्पशास्त्रावरील संस्कृत ग्रंथाचे मराठीत भाषांतर. प्राचीन वास्तुशास्त्रावर हिंदी, मराठी व इंग्रजीत ग्रंथरचना.

४. **श्री. वसंत वि. अकोलकर**

जन्म ६ जुलै १९११. पुण्यातील वाडिया महाविद्यालयात आणि पुणे विद्यापीठ येथे मानसशास्त्राचे अध्यापन. इंडियन फिलॉसॉफिकल कॉंग्रेस (१९५९) आणि अखिल भारतीय दर्शन परिषद (१९६३) : मानसशास्त्रविभागाचे अध्यक्ष. अमेरिकेतील ड्यूक विद्यापीठात परामानसशास्त्रीय प्रयोगशाळेत काम (१९६२) मराठी विश्वकोश व मराठी तत्वज्ञान महाकोशाचे अभ्यागत संपादक. मानसशास्त्र, परामानसशास्त्र व तर्कशास्त्र या विषयांवर विपुल लेखन. १९९२ मध्ये *परामानसशास्त्र (अतींद्रिय मानस)* हा ग्रंथ प्रकाशित.

५. **प्रा. मोहन पाठक**

गेली २०-२२ वर्षे वि.प्र. मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात सेवा, मराठी व ग्रंथपालन शास्त्राचे गेली १६ वर्षे अध्यापन. मुंबईच्या साहित्य संघातून 'साहित्य विशारद' ही पदवी प्राप्त. १९७५ पासून सातत्याने अनेक नियतकालिकांतून विविध विषयांवर विपुल लेखन. ठाण्यातील साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांशी घनिष्ठ संबंध.

# सुभाषित

*सम्पदो महतामेव महतामेव चापद: ।*
*वर्धते क्षीयते चन्द्रो न तु तारागण: क्वचित् ॥१॥*
*वदनं प्रसाद सदनं सदयं हृदयं सुधामुचो वाच: ।*
*करणं परोपकरणं येषां केषां न ते वन्द्या: ॥२॥*
*यदमी दशान्ति दशानान्त रसना तत्स्वादु सौख्यमनुभवति।*
*प्रकृतिरियमतानां क्लिश्यन्ति यदन्यकार्येषु ॥३॥*
*पद्माकरं दिनकरो विकचं करोति*
*चंद्रो विकासयति कैरवचक्रवालम् ।*
*नाभ्यर्थितो जलधरोऽपि जलं ददाति*
*सन्त: स्वयं परहिते विहिताभियोग: ॥४॥*
*प्रथमवयसि पीतं तोयमल्पं स्मरन्त:*
*शिरसि निहितभारा: नारिकेर: नराणाम् ॥*
*न हि कृतमुपकारं साधवो विस्मरन्ति ॥५॥*
*तुङ्गत्वमितरा नाद्री नेदं सिन्धावगाधता ।*
*अलङ्घनीयतोहेतुरुभयं तन्मनस्विनि ॥६॥*

## डॉ. मो. दि. पराडकर

१) जगात संपत्ती व विपत्ती या दोन्हींना ज्यांना सामोरे जावे लागते ते मोठेच असतात चांगले असतात हे सत्य या श्लोकातल्या पहिल्या ओळीतच सांगितले. सुभाषितकार म्हणतो, संपत्ती ज्याप्रमाणे मोठ्या लोकांजवळ असते त्याचप्रमाणे त्यांच्यावरच आपद: म्हणजे संकटे कोसळतात. असे का व्हावे? चांगल्या लोकांचा जास्त उत्कर्ष होतो तसेच त्यांना आपत्तींनाही तोंड द्यावे लागते याचे कारण दुसऱ्या ओळीत चंद्र आणि नक्षत्रे किंवा ताऱ्यांचा समुदाय यांचे उदाहरण घेऊन सांगितले. क्षीण होणे आणि वाढणे कलाकलांनी कृष्णपक्षात कमी कमी होत जाणे आणि शुक्लपक्षात कलेकलेने वाढत जाणे या गोष्टी चन्द्राच्या बाबतीतच होतात, नक्षत्रे किंवा तारकांचा पुंज यांच्याबाबतीत हा अनुभव येत नाही. चन्द्राला जो मुळात मोठेपणा आहे तो तारागणांना किंवा नक्षत्रांना नाही. चन्द्रच रात्री अंधार उजळून टाकू शकतो तारागणांत ते सामर्थ्य नसते. म्हणूनच शोभा वाढते आणि कमी होते. मोठ्या लोकांना, चांगल्या लोकांनाच या उत्कर्ष-अपकर्षाच्या संपत्तिविपत्तीच्या चक्रातून जावे लागते. सामान्यांना याचा अनुभव येण्याचे कारण नसते. त्यांच्या बाबतीत वधघट नसते म्हणूनच वैभव आणिक आपत्तीही असती केवळ थोरांना (-डॉ. भालचंद्र वेलणकर) हेच खरे.

२) दुसऱ्या श्लोकात, वंदनीय ठरणाऱ्या सज्जनांचे गुण कोणते हे सांगितले. त्याचा चेहरा (वदन) प्रसन्नतेचे माहेरघर असतो, त्याचे हृदय दयेने समन्वित असते, त्यात दयाळूपणा असतो आणि त्याची वाणी (वाच:) सुधा म्हणजे अमृताचा वर्षाव करणारी असते. अशा वाणीला भवभूतीने 'सुनृता'वाक् म्हटले त्यामुळे लोकांचे मन नाचायला लागते. त्याचे कार्य म्हणजे त्याची करणी ही परोपकाराची असते. यांपैकी एक एक गुणही मोलाचा आहे, संपर्कात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आनंद देणारा आहे, मग हे सर्व गुण ज्या व्यक्तीत एकवटले ती कुणाला वंदनीय ठरणार नाही? प्रश्न अशा पद्धतीने विचारला की त्याचे उत्तर होकारार्थीच आले पाहिजे. याला प्रश्न अलंकार म्हणतात. एका इंग्रजी कवीने Breathes there the man with soul so dead? Who never to himself has said this is my own native land? असाच प्रश्न आपल्या कवितेत विचारलेला आहे.

३) जगात दोन्ही प्रकारचे लोक आहेत, काही मनाने निर्मळ तर काही मनाने पुष्कळ गढूळलेले. या श्लोकात निर्मळ लोकांची प्रकृती म्हणजे त्यांचा स्वभाव सांगितला. 'विमलानां इयं प्रकृति:' यामुळे ते सतत 'अन्यकार्येषु' म्हणजे दुसऱ्यासाठी कष्ट करतात, झिजत असतात यालाही पहिल्या ओळीत व्यवहारातले उदाहरण सांगितले. अमी दशना: म्हणजे हे दात चावण्याचे काम करतात पण चव घेणे हे त्यांचे काम नाही; चव घेण्याचे आस्वाद घेण्याचे काम रसना म्हणजे जीभच करत असते. किंबहुना दातांचे काम स्वत:साठी नसून जिभेच्या चवीसाठी तिच्या आस्वादासाठी असते. असेच काम स्वच्छ निर्मळ मनाचे लोक दुसऱ्यांसाठी करत असतात. हा त्यांचा स्वभाव असतो. त्यांनी पांघरलेला बुरखा नसतो. काही काळ किंवा एखादा लाभ करून घेण्याच्या दृष्टीने दुसऱ्यासाठी कष्ट करणे निराळे आणि तसा स्वभावच असणे ही अगदी निराळी गोष्ट आहे. याला अंगभूत चांगुलपणा म्हणतात.

४) ही माणसे सन्तप्रकृतीची ते आपणहूनच म्हणजे स्वयंस्फूर्तीने परहितासाठी काम करणारे (विहित: अभियोग: यै: ते) झटणारे असतात. यासाठी त्यांना विनंती करावी

लागत नाही, 'मदत द्या'? अशी याचना करावी लागत नाही. हाच 'स्वयं' चा अर्थ यासाठी या श्लोकाच्या तीन ओळीत तीन उदाहरणे दिली. पद्माकर म्हणजे दिवसाला उगवणारे कमळ. सूर्याच्या प्रकाशामुळे ही कमळे उमलतात. यांना सूर्याला म्हणजे दिनकराला विनंती करावी लागत नाही. जी गोष्ट सूर्याची तीच चंद्राची. हा चंद्रही कैरव म्हणजे रात्री चंद्रप्रकाशामुळे उमलणाऱ्या कमळांच्या चक्रवालाला म्हणजे समूहाला विकसित करण्याचे कार्य बजावतो. तिसरे उदाहरण जलधरांचे म्हणजे ढगांचे याचीही अभ्यर्थना म्हणजे याचना करावी लागत नाही. तो पाण्याचा वर्षाव करणारच, कारण पाणी देणे हे त्याचे कर्तव्य, ते तो तत्परतेने बजावतो. याचना किंवा विनवणी याची जरूर सूर्यचंद्रांना भासत नाही. मेघांना त्याची मातब्बरी नसते. याप्रमाणेच साधुस्वभावाची माणसे 'विना प्रार्थना' परहितासाठी तत्पर असतात. अर्ज मागवून आणि विनवणी करून सहानुभूतीने विचार करून परहित करणेही प्रशंसनीय; परंतु हे काम संतांचे नव्हे. ते स्वभावानेच दुसऱ्याचे हित जपण्यात गुंतलेले असतात. म्हणजे परोपकार हे त्यांनी व्रत म्हणून आंतरिक प्रेरणेने स्वीकारलेले असते. कुणाच्या प्रेरणेने किंवा कुणाला मदत करण्याचे श्रेय मिळावे म्हणून ते परोपकार करीत नाहीत.

५) या श्लोकात सज्जनांचा,कृतज्ञता हा आणखी एक गुण सांगितला. कुणी जर त्यांच्यावर उपकार केला असेल तर तो मोठा की लहान याचा विचार करणे त्यांना योग्य वाटत नाही; उपकार करणाऱ्या व्यक्तीचे आयुष्यभर स्मरण ठेवणे त्यांना योग्य वाटते. हा गुण सध्याच्या चंगळवादी जगात फार दुर्मीळ होत चाललेला आहे. हे पटवण्यासाठी 'नारिकेर' (र आणि ल यांत अभेद मानलेला आहे) म्हणजे नारळाच्या झाडाचे उदाहरण घेऊन सुभाषितकाराने मार्मिकपणाची प्रचीती आणून दिलेली आहे. नारळाच्या झाडांना सुरुवातीला थोडे पाणी द्यावे लागते. 'प्रथमवयसि' म्हणजे पहिल्या वयांत म्हणजेच सुरुवातीला झाड लहान असताना हे पाणी हे फार असते असे नव्हे. ते थोडेच असते. परंतु या उपकाराचा भार ही झाडे सतत आपल्या शिरावर धारण करतात. नारळ अगदी झाडाच्या शेंड्याला लागलेले असतात. यासाठी 'शिरसि निहितभारा:' अशी मोठी समर्पक शब्दयोजना केलेली आहे. माणसाकडून मिळालेले पाणी जरी थोडे असले तरी नारळात पाणी भरपूर असते आणि एका झाडाला अनेक नारळ लागतात. हे लक्षात घेतले म्हणजे 'आजीवितान्तं' म्हणजे ही झाडे आपले आयुष्य संपेपर्यंत माणसाला गोड पाणी देत असतात. माणसाकडून मिळालेल्या पाण्याचा हा भरपूर मोबदला आणि तोही त्याच्या उपकारांचा भार सतत डोक्यावर म्हणजे शेंड्यावर वाहून देणारी नारळांची झाडे म्हणजे अल्प अशा उपकाराबद्दल कृतज्ञता बाळगण्याची, नव्हे ती आनंदाने शिरावर धारण करण्याचा आदर्शच. हाच आदर्श साधू लोक आपल्यासमोर ठेवतात आणि आयुष्यभर उपकाराची अनेकपट फेड करण्यात धन्यता मानतात. 'साध्याही विषयात आशय किती मोठा आढळे' याचे हे सुभाषित म्हणजे उत्तम उदाहरणच नव्हे का?

६) शेवटचा श्लोक मनस्वी म्हणजे स्वाभिमानी व्यक्तीचा सुभाषितकाराने केलेला गौरव आहे. अद्रौ म्हणजे पर्वताच्या बाबतीत उंची (तुङ्गत्वम्) असते परंतु 'इतरा' हा स्त्रीलिंगी शब्द'अगाधता'कडे बोट दाखवणारा; उंची असली तरी पर्वताला खोली नसते. सिन्धौ म्हणजे सागराच्या बाबतीत 'अगाधता' म्हणजे खोली असते परंतु त्याला उंची नसते तो जमिनीवरच पसरलेला असतो. परंतु मनस्वी किंवा स्वाभिमानी माणसाजवळ पर्वताची उंचीही असते आणि समुद्राची खोलीही असते. म्हणून हा सुभाषितवजा श्लोक लिहिणाऱ्या माघाने शिशुपालवधात स्वाभिमानी माणसाला पर्वत असणे आणि समुद्र (सागर) या दोन्हींवर मात करणारा असे म्हटले,कारण 'उभयंतत्', म्हणजे 'तुङ्गत्वम्' आणि 'अगाधता' या दोन्हींचा दुर्मीळ संगम त्यांच्या व्यक्तित्वात झालेला असतो व म्हणून तो 'अलङ्घनीय' च मानायला हवा. मनस्वी हे उपमेय आणि पर्वत आणि समुद्र ही प्रसिद्ध उपमाने; पर्वत उंचीच्या बाबतीत आणि समुद्र खोलीच्या बाबतीत. पण यात उपमेय हे उपमानावरही मात करणारे असे वर्णन केल्यामुळे हा श्लोक आलंकारिकांच्या दृष्टीने 'व्यतिरेक' अलंकाराचे उत्तम उदाहरण. अर्थात यापेक्षाही या श्लोकाचा आशय अधिक महत्त्वाचा; मनस्वी व्यक्तींच्या उंच आणि गहन व्यक्तित्वाला मानाचा मुजरा करणारा म्हणूनच अविस्मरणीय. थोडक्यात पुष्कळ सांगण्याचे सुभाषितांचे सामर्थ्य पटविणारा हा आणखी एक श्लोक.

•••

# भारतीय धर्म आणि तत्त्वज्ञान

डॉ. मो. दि. पराडकर

*दि. २६, २७ व २९ डिसेंबर १९९७ रोजी ठाणे येथे आयोजित केलेल्या दुसऱ्या बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषदेच्या - अधिवेशन प्रसंगी 'भारतीय धर्म आणि तत्त्वज्ञान' या विभागाचे अध्यक्ष डॉ. मो. दि. पराडकर यांचे अध्यक्षीय भाषण.*

धर्म आणि तत्त्वज्ञान या मानवी संस्कृतीच्या दोन अत्यंत महत्त्वाच्या शाखा आहेत. त्यांच्या परस्परसंबंधाचा अभ्यास धर्माच्या तत्त्वज्ञानात होतो. तत्त्वज्ञानाची पद्धती, दृष्टिकोण, भूमिका यांचा उपयोग करून धर्माची तात्त्विक मीमांसा करणे धर्म-तत्त्वज्ञानाचे कार्य आहे. तत्त्वज्ञानाचा 'जीवनदृष्टी' हा अर्थ केला तर धर्म आणि तत्त्वज्ञान हे समव्याप्त ठरतील. कारण जीवनदृष्टीत जीवनाच्या सर्व अंगांचा समावेश होतो. तथापि धर्म आणि तत्त्वज्ञान यांच्या दृष्टिकोणात व पद्धतीत मूलतः फरक असतो. तत्त्वज्ञानाचा भर वैचारिक मीमांसेवर आणि बौद्धिक चिकित्सेवर राहतो; तर धर्माचा भर आचारावर किंवा जीवनपद्धतीवर असतो. श्रुतिशरण भूमिका न स्वीकारता तत्त्वज्ञान धर्मजीवनाची मीमांसा करू इच्छिते तर दुसऱ्या बाजूला श्रुती आणि सत्पुरुष यांच्यावरील श्रद्धेतून धर्मजीवनाचा प्रारंभ आणि विकास होतो. 'श्रुति' व 'धार्मिक' अनुभूती यांचे प्रामाण्य तत्त्वज्ञानात 'तर्कनिष्ठ' भूमिकेतून तपासले जाते. तर धर्मामध्ये श्रुती आणि अनुभूती यांची सहाय्यक प्रतिमा म्हणून तर्काचे व्यवस्थापन केले जाते. तत्त्वज्ञानात श्रद्ध, अश्रद्ध, अंधश्रद्ध, अज्ञेयवादी आणि साक्षात्कारवादी या सर्व भूमिकांची तौलनिक समीक्षा होऊ शकते.

तत्त्वचिंतकांचा दृष्टिकोण आणि पद्धती यांचे परिणाम त्या धर्मतत्त्वज्ञानावर व्हावे हे अपरिहार्यच आहे. प्लेटो, अक्वायन्स, लायबेनिझ, हेगेल, व्हाइटहेड यांसारखे पाश्चात्य विचारवंत तत्त्वज्ञानातील 'सत्ताशास्त्रीय' भूमिकेला प्राधान्य देणारे आहेत. तर ह्यूम, ड्यूई यांची भूमिका सत्ताशास्त्रविरोधी आहे. यामुळे या सत्ताशास्त्रविरोधी व्यक्तींचे धर्मतत्त्वज्ञान इहवादी व सामाजिक मूल्यांना प्राधान्य देणारे बनते. बर्ट्रांण्ड रसेल परंपरागत धर्मप्रणालीचा त्याग करणारे, तर संतायना धर्माची पुनर्रचना परलोकनिष्ठ भूमिकेऐवजी निसर्गवादी भूमिकेतून करणारे. तार्किक व भाषिक विश्लेपणावर भर देणारे विचारवंत धर्माच्या संदर्भातील सत्ताशास्त्रीय, विश्वशास्त्रीय व आचारशास्त्रीय समस्या समजून घेण्याऐवजी त्या सोडविण्यासाठी ईश्वर, आत्म्याचे अमरत्व या संकल्पनांची तार्किक व भाषिक चिकित्सा करण्यावर भर देताना दिसतात. धर्माने तत्त्वज्ञान उभे करण्याचा हेतू नसतानाही Creative Evolution चे लेखक हेन्री बर्गसां किंवा Ethics चे प्रणेते स्पिनोझा यांसारख्यांनी तात्विक पद्धतीने विवेचन करताना आपल्या तत्त्वचिंतनातून विश्वाची निर्मिती, स्वरूप, प्रयोजन, ईश्वर, ईश्वर आणि मानव यांचे संबंध

आणि जीवनमूल्ये यासंबंधीच्या मूलभूत प्रश्नांना स्पर्श करून धर्मतत्वज्ञानाची मांडणी केली असेच म्हणावे लागेल.

## धर्माचे तत्त्वज्ञान आणि धर्मशास्त्र

प्रत्येक सांस्कृतिक लोकसमूहात निर्माण झालेल्या धार्मिक प्रथा, दृष्टिकोण, मूल्यप्रणाली यांमधून त्या त्या लोकसमूहाचे धर्मशास्त्र निर्माण होते. हे धर्मशास्त्र त्या त्या संप्रदायाचे तात्त्विक अधिष्ठान असते. यात 'निःश्रेयस् धर्म' आणि 'आचारधर्म' यांचा समावेश होतो. यांची तात्त्विक मीमांसा धर्माच्या तत्त्वज्ञानात होते. हिंदू, बौद्ध, जैन, शीख, झरतुष्ट्री, यहुदी, ख्रिश्चन व इस्लाम या धर्मांची व त्यांच्यातील उपसंप्रदायांची धर्मशास्त्रे हा धर्माच्या तत्त्वज्ञानाचा 'पुरावा' म्हणण्यास हरकत नाही. विविध धर्मशास्त्रांत एखादा पवित्र ग्रंथ त्या धर्माचा मूलाधार मानलेला असतो किंवा काही ग्रंथ (उदाहरणार्थ प्रस्थानत्रयी) मूलाधार म्हणून स्वीकारले जातात आणि त्या धर्माची जीवनविषयक विविध प्रश्नांसंबंधी भूमिका स्पष्ट करणारी, भूमिकेचे संकलन, समर्थन आणि व्यवस्थापन करणारी, हिंदू धर्मतत्त्वज्ञान, ख्रिश्चन धर्मतत्त्वज्ञान यांसारखी धार्मिक तत्त्वज्ञाने निर्माण होतात. धर्माच्या तत्त्वज्ञानाच्या ज्ञानशास्त्रीय मीमांसेत 'श्रुतिप्रामाण्य-वाद' आणि ऐतिहासिक 'धर्मसमीक्षा' यांची तात्त्विक चिकित्सा करण्यात येते. विशिष्ट धर्माचा पुरस्कार करणे हे धर्माच्या तत्त्वज्ञानाचे कार्य नाही; मानवी जीवन व संस्कृतीमधील धर्माचा खरा अर्थ, त्याचे कार्य, महत्त्व आणि प्रामाण्य यांची चिकित्सा करणे हा या तत्त्वज्ञानाचा व्यापक हेतू असतो.

धर्माच्या तत्त्वज्ञानाच्या अभ्यासकाचा धर्मशास्त्र आणि संस्कृती यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन जसा अंधश्रद्धेचा नसतो तसा अश्रद्धेचाही नसतो. धर्म हा मानवी जीवनातील प्रदीर्घ इतिहास असलेला, विशेष स्वरूपाचा घटक आहे. अनेक धर्म-संस्थापक, द्रष्टे, महापुरुष, प्रज्ञावंत, जीवन्मुक्त यांना जीवनाच्या ज्या अन्वयार्थाचे आकलन झाले ते धर्मातून प्रकट झालेले आहे. महापुरुषांनी स्वीकारलेले आदर्श, त्यांनी केलेल्या उपासना, त्याग यांची प्रेरणादायक कथा धर्मात समाविष्ट असते. दैन्य, दुःख, पाप यांविषयीच्या त्यांच्या धारणा, ते दूर करण्यासाठी त्यांनी सुचविलेले मार्ग, आत्मा, सृष्टी, ईश्वर, परलोक, कर्मसिद्धांत या तात्त्विक प्रश्नांबाबतच्या त्यांच्या भूमिकाही या धर्मात समाविष्ट असतात. प्रत्येक धर्माचे अनुयायी महान् सत्पुरुषांच्या अनुसरणाने परम सत्याबाबतचे अनुभव संपादन करण्याच्या प्रयत्नात असतात. अशा वर्तनाचा एक भाग व्यक्तिगत साधनेचा तर दुसरा भाग सामुदायिक असतो. पहिल्यात विवेक, वैराग्य, मुमुक्षुत्व यांप्रमाणे योगाभ्यास, ज्ञानभक्तियुक्त निष्काम कर्माचे आचरण यांचा अंतर्भाव असतो. दुसऱ्या भागात सामुदायिक पूजा, प्रार्थना, तीर्थयात्रा इत्यादींचा समावेश होतो. या सर्वांचा हेतू अर्थातच धार्मिक सद्गुणांचा व अनुभूतींचा परिपोष प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात होत रहावा हा असतो.

स्व. लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी 'ऐतिहासिक पद्धती व ग्रंथप्रामाण्यपद्धती' अशा दोन विचार-प्रवाहांचा उल्लेख आपल्या 'धर्मरहस्य' या डॉ. के. ल. द. दफ्तरी यांच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत केलेला आहे. धर्माचे तत्त्वज्ञान या विषयाच्या अभ्यासात ग्रंथप्रामाण्यपद्धतीपेक्षा

ऐतिहासिक पद्धतीवर भर देणे श्रेयस्कर ठरेल. या पद्धतीचा अवलंब करणाऱ्या लोकमान्य टिळक, योगी अरविंद घोष, डॉ. राधाकृष्णन यांसारख्या आधुनिक धर्मविवेचक विचारवंतांच्या मतांचे अनुकरण करावे लागेल. यांच्या मतानुसार व्यास, वाल्मीकी, महावीर, गौतम बुद्ध यांसारखे द्रष्टे, ज्ञानेश्वर, गुरु नानक यांसारखे संत यांच्या ठिकाणी बुद्धिवाद व दिव्यदृष्टी यांचा संगम झालेला होता व हे युगानुरूप व देशकालपरिस्थितीला अनुलक्षून परंपरागत धर्मात परिवर्तन करण्याची तयारी दर्शवितात. एखादा 'वाद' गृहीत धरून किंवा प्रमाण मानून धर्मांची मीमांसा करणे उपयुक्त ठरेल असे दिसत नाही. या तत्त्वज्ञानाचे स्वरूप केवळ ऐहिकवादी व बुद्धिवादी असूनही चालणार नाही; आत्मा, ईश्वर आत्म्याचे अमरत्व, साक्षात्कार या सर्वांची निव्वळ काल्पनिक म्हणून बोळवण करणे न्यायपूर्ण ठरणार नाही. शब्दप्रामाण्यवादी दृष्टीमुळे निर्माण होणारे दोष स्पष्ट करून धार्मिक अनुभूती, श्रद्धा व दृष्टिकोन यांच्यातील अंतर्विरोध किंवा विसंगती याही उघड करणे व सारभूत व असार तत्त्वांचा विवेक साधावा लागेल.

**धर्माचे तत्त्वज्ञान, उपयोग आणि महत्त्व :** धर्म, धर्मशास्त्र व संस्कृती यांच्याविषयी उपलब्ध ज्ञानसामग्रीची मदत घेऊन मानवांच्या धार्मिक श्रद्धा, त्यांची अनुभूती व आचार यांचा चिकित्सक व तात्त्विक अभ्यास करण्याचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम डोळ्यापुढे ठेवणे हे धर्माच्या तत्त्वज्ञानाचे प्रमुख कार्य. खरा धर्म नीट न समजल्यामुळे, विज्ञानाशी त्याचे वैर कल्पिल्यामुळे आणि धर्मसंस्थापकांची व संत-महात्म्यांची प्रज्ञा, करुणा व विश्व-कल्याणाची मंगल दृष्टी लक्षात न घेतल्यामुळे धर्म व तत्त्वज्ञान यांच्या क्षेत्रात विविध समस्या आणि संघर्ष निर्माण झालेले दिसतात. सामाजिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात अन्य कारणांबरोबर धार्मिक गैरसमजही मानवी सहकार्यात अडथळे निर्माण करीत असल्याचे जाणवते. त्यामुळे अज्ञान, जडवाद, देहदंडवाद, परलोकनिष्ठा यांमुळेही निष्पक्ष विवेचनात अडसर निर्माण होत असतात. यासाठी स्वतःमधील प्रज्ञा जागृत व स्थिर करणे आणि प्रज्ञावंतांचे जीवन आणि जीवनदृष्टी यांचे सापेक्षी अवलोकन करणे योग्य ठरेल.

**धर्मस्वरूप कार्य आणि उद्दिष्ट**

धर्मपंडितांनी 'चोदनालक्षण धर्म' हा प्रधान व श्रेष्ठ मानला तर सामाजिक विचारवंतांनी 'धारणाद्धर्म' वर जोर दिला. साक्षात्कारी उपासकांनी 'निःश्रेयस्' धर्माचा निर्देश केला. तिन्हींचा समन्वय करूनच धर्माचे उद्दिष्ट व कार्य यांची यथार्थ कल्पना येऊ शकेल. स्वामी विवेकानंद, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, विनोबा भावे, डॉ. राधाकृष्णन्, श्री. अरविंद यांसारख्या आधुनिक धर्मवेत्यांनी १.श्रुति, २. सामाजिक उपयुक्तता व ३. साक्षात्कार या तिन्ही लक्षणांचा समन्वय केलेला दिसतो. यांची भूमिका निव्वळ श्रुति-शरणतेची, धर्मोच्छेदक बुद्धिवादाची किंवा निव्वळ आत्मानुभूतीच्या प्रामाण्याची नाही. धर्मातील सापेक्ष काय व शाश्वत काय यांचा हे लोक विचार करतात. यांच्या दृष्टीने धर्मातील मूलभूत स्वरूपाची आंतरिक एकता समजून घेणे व अध्यात्मनिष्ठ साक्षात्कारी भूमिकेतून सर्व धर्म एका मानव-कल्याणाचे ध्येय साकार करू इच्छिणाऱ्या विश्वधर्माचे आविष्कार मानणे हेच योग्य आहे. श्रद्धा हे चोदनालक्षणच धर्माचे सार, व्यक्ती व

समाज यांचे नियंत्रण, मार्गदर्शन, संघटन व व्यवस्थापन करणारे विधिनिषेध, प्रेरणा, आचारधर्म व नैतिक नियम हे 'धारणात्मक' धर्माचे सार व अंतिम सत्ता, सामाजिक आदर्श व मूल्ये आणि आत्मानुभूती यांच्या संदर्भातच वागणुकीच्या मुळाशी असलेली ध्येयदृष्टी हे 'निःश्रेयस्' धर्माचे सारभूत तत्त्व.

यामुळे मानवी संस्कृतीमधील धर्माचे स्थान, कार्य व उद्दिष्ट यांचा विचार करताना मानवी जीवनातील जादू, विज्ञान, नीती, कला, तत्त्वज्ञान व अध्यात्म या सर्वांचा अंतर्भाव करावा लागतो. कारण या सर्वांनी मानवी संस्कृती संपन्न होते. यांपैकी विज्ञान, कला, नीती आणि तत्त्वज्ञान संस्कृतीच्या शरीराचे महत्त्वाचे अवयव, धर्म हा संस्कृतीला प्राणभूत आणि अध्यात्म हा या संस्कृतीचा आत्मा. सापेक्षाचा शाश्वताशी आणि मानवाच्या जीवनातील साधनमूल्यांचा परममूल्याशी संबंध स्थापित करण्याचे कार्य धर्माने केले पाहिजे. धर्माचे आविष्कार जरी कलात्मक असले तरी त्याचे मूळ अधिष्ठान कालातीत ठरते. व्यक्तिच्या अभिरुची आणि समूहांच्या जीवनपद्धती परिवर्तनशील असतात. परंतु माणसाच्या आत्मशोधाची वाटचाल अखंड सुरू राहते, म्हणूनच रवींद्रनाथांनी या धर्मशोधकांना 'अनंताचे वाटसरू' किंवा 'आनंदयात्री' ही संज्ञा दिली. भारतीय धर्म हा केवळ एकेश्वरवादी किंवा अनेकेश्वरवादी किंवा सर्वेश्वरवादीही नाही. कारण तो विश्वरूप आणि विश्वातीत अशी आत्मसत्ता मानतो. श्री अरविंद म्हणतात "Indian Religion founded itself on the conception of a timeless, nameless and formless supreme... The one Godhead is worshipped as the All, for all in the universe is He or made out of His being or His nature. But Indian Religion is not therefore pantheism, for beyond this universality it recognises the supercosmic eternal. Indian polytheism is not the popular polytheism of ancient Europe, for here the worshipper of many Gods still knows that all his divinities are forms, names, personalities and powers of One, his gods proceed from the one Purusha, his goddesses are energies of the One Divine Force."

भारतीय दर्शनातील त्रिमूर्तिसिद्धांत किंवा पंचायतनपूजा यांच्या मुळाशी हीच समन्वयी आध्यात्मिक श्रद्धा आहे. 'एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति' (ऋग्वेद १.१६४, ४६) किंवा 'एको वशी सर्वभूतान्तरात्मा एकं रूपं बहुधा यः करोति' (कठोपनिषद् २.२.१२) या श्रुतिवाक्यांतून विश्वातील अनेकतेमागे, विविधतेमागे असणाऱ्या विश्वात्मक आत्मिक एकतेचा निर्देश आढळतो. या आत्मसत्तेची उपासना हा भारतीय धर्मांचा प्राणभूत घटक आहे. तसे पाहिले तर सर्वच धर्मांच्या मुळाशी मूलतः विश्व आणि मानव यांमधील आंतरिक एकतेच्या अनुभवाचे अधिष्ठान आहे. हा धर्म अंधश्रद्धा आणि अश्रद्धा यांच्या पलीकडे जाणारा आहे विशुद्ध जीवनाच्या उपासनेचा मार्ग यात आढळतो. यातूनच विज्ञान, कला, नीती व समाजव्यवस्था यांचे मूलस्रोत असणारी अध्यात्मनिष्ठा व्यक्त होते.

तत्त्वज्ञान या शब्दाचा इंग्रजीतील पर्यायवाची शब्द Philosophy हा आहे. यात 'फिल' हा धातू आणि 'सोफिया' हे नाम; यांपासून

Philosophia ही ग्रीक संज्ञा तयार होते. या संज्ञेचा अर्थ आहे 'ज्ञानप्रीती' किंवा 'ज्ञाननिष्ठा' ही संज्ञा आन्वीक्षिकी (Logic), शास्त्रीय विवेचन, परा विद्या, मोक्षशास्त्र, आत्मविद्या अशा विविध आणि व्यापक अर्थांनी 'तत्त्वज्ञान' ही संज्ञा भारतीय म्हणजे प्राच्य आणि युरोअमेरिकन (प्रतीच्या) तत्त्वज्ञानात वापरली गेलेली दिसते. उपनिषदांचे द्रष्टे ऋषी, शंकराचार्य यांच्याप्रमाणे सॉक्रेटीस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, काण्ट, हेगेल, यांसारख्या विचारवंतांनी 'तत्त्व' आणि 'तत्त्वज्ञान' ह्या संज्ञा विचार व आचार यांनी मिळून तयार होणारे 'सम्यक् जीवनदर्शन' अशा अर्थाने वापरलेल्या आहेत. तत्त्वज्ञानाच्या कार्यात वास्तविक घटना व मूल्य यांची तात्त्विक मीमांसा, त्यांचे संबंध व स्वरूप यांची निश्चिती, सत्यता, प्रामाण्य आणि अंतिमता यांची चिकित्सा यांच्याबरोबर विचार आणि आचार यांना आधारभूत ठरणाऱ्या म्हणजेच मार्गदर्शक तत्त्वांची व्यवस्था लावणे याचाही समावेश होतो. मानवी 'अनुभव', विश्वातील पदार्थांचे 'अस्तित्व' आणि लोकव्यवहाराचे दिग्दर्शन करणारी 'मूल्ये' यांचे तात्त्विक विश्लेषण व विवरण हे तत्त्वज्ञानाचे कार्य मानले जाते. धर्म आणि धर्मशास्त्र यांच्या संदर्भातल्या व्यापक समस्या याच आहेत. साहजिकच धर्म आणि तत्त्वज्ञान यांच्यात दृष्टिकोण, प्रयोजन व पद्धती यांबाबतीत भिन्नता असली तरी मूलभूत समस्या एकच असल्यामुळे यांचे संबंध सदैव निकटचेच राहणार.

तत्त्वज्ञानात ज्ञानप्रक्रियेचे मानसशास्त्रीय विश्लेषण, ज्ञानाच्या सत्ताशास्त्राची मीमांसा म्हणजेच सत्ताशास्त्रीय आधारांचे विवेचन, सत्याचे स्वरूप व निकष हे महत्त्वाचे प्रश्न. जीव, जगत् आणि ईश्वर यांच्या संदर्भात ज्ञानशास्त्रीय विवेचन केले नाही तर धर्म म्हणजे अंधश्रद्धा ठरते. आन्वीक्षिकी किंवा मूलत: तर्कशास्त्र यात अनुमानात्मक विचारप्रक्रियेचा समावेश होतो. म्हणूनच सी. एम. पियर्स, आर. एम. ईटन यांसारख्या विचारवंतांनी विधानांच्या प्रकारांचे, त्यांच्या रचनेचे व युक्तिवादाचे विवेचन केले. भारतीयांनी न्यायशास्त्रात सत्यता व प्रामाण्य या वैचारिक मूल्यांच्या संदर्भात युक्तिवादाचे मोठे सूक्ष्म विवेचन केलेले आहे. सत्ताशास्त्रात अंतिम सत्ता, सृष्टी व ज्ञाता यांची तात्त्विक मीमांसा यु.सी.युईंग, गिल्बर्ट राइल, ए. एम. व्हाइटमन, ए. ई. टेलर यांनी केली. भारतीय परिभाषेनुसार ब्रह्म, ईश्वर, विश्वसृजन, आत्मा यांचे वेदांत, जैनदर्शन यांतले विवेचन सत्ताशास्त्राचीच उकल करणारे आहे. या समस्यांच्या संदर्भातच धर्माचे तत्त्वज्ञान उदयाला येते व अंतिम सत्ता, ईश्वर-विश्वसंबंध, ईश्वर-मानवसंबंध, अमरत्व, मोक्ष या धर्मतत्त्वज्ञानाच्या समस्यांचा विचार आवश्यक होऊन बसतो. नीतिशास्त्र ही तत्त्वज्ञानाची महत्त्वाची शाखा. यात जे. एच. मरीहेडच्या मतानुसार मानवी वर्तन आणि चारित्र्य विषयक मूल्यांचे, आदर्शांचे विवेचन करणारे शास्त्र हे नीतिशास्त्राचे स्वरूप. सी. एफ. स्टीव्हनसन् यांनी वर्णनात्मक, आदर्शक आणि विश्लेषक असे नीतिशास्त्राचे तीन भाग केले.

आधुनिक काळात 'पद्धतिशास्त्र' ही तत्त्वज्ञानाची सहाय्यक शाखा. तत्त्वचिंतकाने स्वीकारलेल्या पद्धतीचा त्याच्या तत्त्वचिंतनावर आणि सैद्धांतिक फलश्रुतीवर परिणाम व्हावा हे स्वाभाविकच आहे. प्लेटो-हेगेल यांची 'डायलेक्टिकल पद्धती', बर्गसन यांची

'अन्त:प्रज्ञापद्धती' (वेदान्तपद्धतीशी जवळीक साधणारी), स्पिनोझाची 'भौमितिक पद्धती', देकार्तची 'संशयपद्धती' यांचा त्यांच्या सिद्धांतांवर फार परिणाम झालेला आहे यात शंका नाही. धर्माच्या तत्त्वज्ञानाच्या संदर्भातही पद्धतिशास्त्राचा विचार करावा लागतो. आज माणसाच्या जीवनदृष्टीत क्रांतिकारक परिवर्तन घडवून आणणारे कोपर्निकसचे खगोलविज्ञान, डार्विनचे उत्क्रांतिवादी जीवशास्त्र, फ्रॉइडचे अबोध मनाचे विश्लेषण करणारे मानसशास्त्र, मार्क्सचे द्वंद्वविकासात्मक, जडवादी इतिहासतत्त्वज्ञान या सर्वांचा परिणाम धर्माच्या स्वरूपावर व त्याच्या उपयुक्ततेवरही व्हावा हे स्वाभाविकच म्हटले पाहिजे.

**आधुनिक तत्त्वचिंतन-** स्थलकालातीत, निर्गुण, निराकार अशा 'सद्‌वस्तू' ची मीमांसा हे तत्त्वचिंतनाचे कार्य असे मानले जात असे. परंतु हे आधुनिक तत्त्वज्ञांच्या मते कालबाह्य मानण्यात आले. ह्यूम आणि काण्ट यांच्या इहवादी व अनुभववादी भूमिकेतून आजच्या तार्किक अनुभववादाचा आणि भाषिक विश्लेषणवादाचा उदय झाला. याचा विकास करण्याचे श्रेय मूर, रसेल, विट्‌गेनस्टाईन, रुडॉल्फ कारनॅप यांसारख्या विचारवंतांना द्यावे लागेल. तत्त्वचिंतनातील सत्ताशास्त्रीय निर्देश व संदर्भ पूर्णपणे गाळून टाकणे योग्य होईल असे पूर्वी काही विचारवंतांना वाटत होते. परंतु हे योग्य नव्हे हे काहींनी आग्रहपूर्वक दाखवून दिलेले आहे. ए. डी. रिची यांनी तार्किक अनुभववादातील प्रमादांवर नेमके बोट ठेवलेले आहे. जॉन पासमोअर यांचा अभिप्राय या संदर्भात उद्‌धृत करण्यासारखाच आहे. "Not all conceptual analytic or linguistic problems are philosophical and not all philosophical problems are conceptual, analytic or linguistic i.e. they cannot be solved merely getting clear about the way in which an expression is used, by removing an ambiguity or by drawing attention to a temptation implicit in our ordinary ways of talking." तत्त्वज्ञानाला तर्कशास्त्राची व भाषिक विश्लेषणाची मदत होत असेल. परंतु तत्त्वज्ञान म्हणजे तर्कशास्त्र किंवा भाषाशास्त्र असे म्हणता येणार नाही.

भारतीय तत्त्वचिंतकाची परंपरा ज्ञानाबरोबरच आचारावर भर देणारी दिसते. उपनिषदांच्या काळात संत, ऋषी व तत्त्वज्ञ या भूमिका एकरूप झालेल्या दिसतात. अनुभवाचे वर्णन व उपपादन करणे आणि जीवनमूल्यांबाबत आदेशात्मक मार्गदर्शन करणे हे तत्त्वज्ञानाचे कार्य होते. धर्म व तत्त्वज्ञान एकरूप होते. त्यांच्यातले संबंध घनिष्ठ होते. हळूहळू धर्मात श्रुतिप्रामाण्यवाद आणि अंधश्रद्धा यांचा प्रवेश झाला व तत्त्वज्ञान निष्क्रिय स्वरूपाचा शब्दच्छल होत गेले. पंथ, संप्रदाय, पोथीनिष्ठा यांत धार्मिक अनुभूतीचा जिवंतपणा अदृश्य होत गेला व तत्त्वज्ञान 'वादग्रस्त' म्हणजे वादविवादांनी ग्रस्त होत गेले. त्यामुळे धर्म व तत्त्वज्ञान या दोन्ही क्षेत्रांतील व्यक्तींचा प्रत्यक्ष जीवनातील समस्यांशी, त्या सोडविण्याशी असलेला संबंध क्षीण होत गेला. बुद्धिवादाला स्वमतसमर्थनाचे स्वरूप आले. वस्तुत: प्रज्ञावंत दार्शनिक 'सत्य', 'श्रेयस्' व 'युक्त' यांनी केवळ तार्किक मीमांसा करून थांबत नाहीत, ती त्यांच्या दृष्टीने आवश्यक असते, परंतु या संदर्भातल्या प्रश्नांचा व उत्तरांचा ते साक्षात् जीवनाशी संबंध प्रस्थापित करतात व त्यामधूनच

निर्माण होणारे सिद्धांत हे जीवनदृष्टीचे तात्त्विक आधार बनतात. 'सर्वं खल्विदं ब्रह्म', 'तत्त्वमसि' या महावाक्यांत तात्त्विक विचारांचे सार आहेच परंतु तो जीवनसाधनेचा मार्गही आहे हे विसरून चालणार नाही. जीवनाचा उगम, स्वरूप, जीवनातील कर्तव्य, अंत, भवितव्य या प्रश्नांच्या चिंतनातून निर्माण होणारी परिणत प्रज्ञा ही तत्त्वचिंतनाची फलश्रुती ठरते. विश्वात्मक आणि संश्लेषक जीवनदृष्टी असणाऱ्या रवींद्रनाथ टागोर किंवा योगी अरविंद यांनी 'अनुभव' याचा अर्थ केवळ 'इंद्रियजन्य निकषणक्षम अनुभूती' असा न करता श्रुती, तर्क व अपरोक्ष प्रतीती असा व्यापक अर्थ स्वीकारला म्हणूनच तार्किक युक्तिवादांच्या आकारिक सुसंगतीच्या, भाषिक विश्लेषणाच्या आणि पद्धतिशास्त्रीय चिकित्सेच्या मर्यादा ओलांडून म्हणजेच ज्ञानाची साधने 'शुद्ध' ठेवण्यावर समाधान न मानता त्यांनी 'साध्या' चा विसर पडू दिला नाही. साहजिकच यांच्या तत्त्वचिंतनात तत्त्वज्ञान व जीवन यांचा सम्यक् विचार दिसतो.

वस्तुत: विज्ञान, धर्म व तत्त्वज्ञान यांच्याप्रमाणे कला व्यापक अर्थाने जीवनानुभवाची अभिव्यक्ती असल्यामुळे तिचीही जीवनापासून फारकत करता येणार नाही. कारण यांचे मूलस्त्रोत सृजनशील अंत:प्रज्ञेतच आहेत हे विचारांती लक्षात आल्यावाचून रहात नाही. कला आणि नीती, कला व धर्म, धर्म व विज्ञान यांत जो संघर्ष दिसतो तो खऱ्या अर्थाने परंपरानिष्ठ आणि सृजनशीलता या दृष्टिकोणांतला असतो. या दोन प्रवृत्ती कोणत्याही लोकसमूहात नेहमीच असतात. पहिली प्रवृत्ती संस्कृतीचे रक्षण करण्यावर भर देते, तर दुसरी संस्कृतीच्या विचारात नावीन्य निर्माण करते. विज्ञानापेक्षा कला अधिक सृजनशील दिसते. कारण ती नियम न सांगता निर्मितिप्रवणतेवर भर देते. निसर्गघटनांचे वास्तव ज्ञान करून देणाऱ्या विज्ञानामुळे जीवनाचे बाह्य अंग संपन्न होते, तर कलावंत जीवनातील बाह्यवस्तूच्या ठिकाणी असलेल्या आत्मतत्त्वाचा अविष्कार करतो. हे लक्षात घेऊनच क्षेमराजाने आपल्या 'शिवसूत्र विमर्शिनी'त 'कलयति स्वस्वरूपावेशेन तत्तद् वस्तु परिच्छिनत्ति इति कलाव्यापार:' असे अन्वर्थक शब्द वापरले होते. भोज राजाने 'तत्त्वप्रकाश' या ग्रंथात 'व्यञ्जयति कर्तृशक्तिं कलेति तेनेह कथिता सा' या शब्दांत कलेचे स्वरूप सांगताना जीवनाला उपयुक्त असणाऱ्या वस्तूंच्या निर्मितीसाठी माणसाने आपल्या कर्तृत्वशक्तीचा कौशल्याने केलेल्या उपयोगाचा समावेश केलेला आहे. व्यक्तींचे मूल्यमापन 'समाजाचे सदस्य' म्हणून करावयाचे का सौंदर्यशास्त्रदृष्ट्या आनंददायक असे चिंतनविषय म्हणून करावयाचे ही समस्या आहे याकडे बर्ट्रांड रसेलने आपल्या 'पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा इतिहास' या पुस्तकात विचारवंतांचे लक्ष वेधले आहे. पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या इ.पू. सव्वाशे ते आधुनिक काळापर्यंतच्या वैचारिक विकासात व्यक्तीवरची सामाजिक बंधने अधिक ताठर करू इच्छिणारे आणि ती शिथिल करू इच्छिणारे या दोन गटांत तत्त्वज्ञ विभागलेले आहेत यावर त्याने मार्मिकपणाने बोट ठेवलेले आहे. बर्ट्रांड रसेलच्या मतानुसार 'प्रत्येक समाजापुढे दोन परस्परविरोधी धोके असतात. एका बाजूला शिस्तीचा अतिरेक आणि परंपरेसंबंधी आत्यंतिक पूज्यभाव. यामुळे एका बाजूला अस्थिपंजरवत होण्याचा धोका आणि दुसऱ्या बाजूला व्यक्तिवाद आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा असा विकास की ज्यामुळे सहकार्यच

अशक्यप्राय व्हावे आणि त्यातून लयाला जाणे किंवा परकीय आक्रमणाला बळी पडणे अनिवार्य ठरू लागते.' (पहा पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा इतिहास-रसेलकृत परिचय अनुवाद-श्रीनिवास हेमाडे- परामर्श खंड १९ अंक ३ नोव्हेंबर १९९७, पृ.५१) उदारमतवादात एका बाजूला तर्कविसंगत मताग्रहावर आधारित नसलेल्या सामाजिक रचनेची स्थापना करण्याचा प्रयत्न असतो, तर दुसऱ्या बाजूला समाजात त्यासाठी अत्यावश्यक असलेली बंधने मान्य करून त्यात अडकून न राहता, समाजाला स्थिरतेची खात्री देण्याचा प्रयत्न असतो. यात यश मिळणे हे मात्र भविष्यकाळावरच अवलंबून आहे.

भारतीय तत्त्वज्ञानाच्या विकासाकडे इतिहासनिष्ठ दृष्टीतून पाहिले तर वैदिक-औपनिषदिक काळातले तत्त्वज्ञान विजिगीषू वृत्तीचे द्योतक आहे; म्हणूनच त्यात यमाला मृत्यूनंतरच्या मानवाच्या अस्तित्वाबद्दल प्रश्न विचारणारा नचिकेत जन्माला आला, वेश्येचा मुलगा सत्यकाम जाबाल ऋषीबरोबर अभ्यास करताना दिसला आणि मैत्रेयी आपल्या नवऱ्याबरोबर, याज्ञवल्क्याबरोबर पूर्णत्वाकडे नेणाऱ्या मार्गाबद्दल पृच्छा करणारी, त्याच्याशी वादविवाद करणारी आढळली. मध्ययुगीन काळात मात्र भारतीयांचे पुष्कळसे वंशज कूपमंडूकवृत्तीचे निघाले, त्यांनी स्वत:ला हजारो 'नको' नी बांधून घेतले. याला विरोध करणारे अस्पृश्य बनले हे खरे. परंतु या काळातही अग्नी अनुष्ण आहे असे अनुभवविरोधी सांगणाऱ्याच्या श्रुतीही अप्रमाण असे उच्चरवाने सांगणारे शंकराचार्य निपजले. 'वेदांचा तो अर्थ आम्हासिच ठावा' असे म्हणणारा शूद्र तुकाराम वारकरी चळवळीचा कळस ठरला.

वस्तुतः १५व्या शतकात कूपमंडूकी वृत्तीला झटकून टाकून एकसंध समाजाचे दर्शन धर्माच्या माध्यमातून घेण्याची प्रचंड लाटच भारतात आलेली दिसते. हे, उत्तर प्रदेशातले संत कबीर, गुजरातेत संत नरसी मेहता, आसामात शंकरदास वगैरेंच्या कार्यावरून उघड होते. आजही भिन्नतेच्या गदारोळात जाणवणारी भारताची एकसंधता ही एखाद्या राजा अशोकाच्या किंवा विदेशी इंग्रजांच्या राज्यामुळे निर्माण झालेली नाही, त्याचे मूळ कारण संपूर्ण देशाला आपली 'पितृभूः पुण्यभूः' मानणाऱ्या शंकराचार्य, ज्ञानेश्वर, कबीर, नरसी मेहता, शंकरदास यांनी केलेले वैदिक पुरुषसूक्ताचे पुनर्गायन आणि तदनुसार आचरण. हेगेलने अठराव्या शतकात आदर्शवाद (Idealism) लोकांपुढे ठेवला हे खरे. परंतु त्याच्या तत्त्वज्ञानाची परिणती हिटलरच्या फॅसिझममध्ये किंवा स्टॅलिनच्या कम्युनिझममध्ये झाली. ईशावास्योपनिषदातल्या पूर्णतावादाची परिणती व्यक्तीला समाजाच्या अंगावरचे गांडूळ ठरविण्यात होण्याचे कारण नाही. कोण्या एका तथाकथित महाजनाचे ऐकण्यासाठी, त्याचा स्वार्थ साधण्यासाठी स्वत:चे जीवन समर्पित करणारा क्षुद्र जंतू मी नाही, मी महाजनाइतकाच पूर्ण आणि स्वतंत्र आहे ही ईशावास्योपनिषदाची शिकवण एकतेतही विविधता जोपासणारी आणि विविधतेतही एकत्वाचे भान राखणारी आहे. कारण हिच्या बुडाशी विश्वाला आर्य (हा गुणवाचक शब्द आहे, वंशवाचक नव्हे) बनवण्याचे स्वप्न आहे, सूर्याला मित्र मानून त्याच्यापासून आपली बुद्धी प्रज्वलित करण्याचा प्रेरणादायक मंत्र आहे.

माणसाच्या बाह्य (भौतिक) साधनविकासातून त्याला आज 'प्रेयस्' लाभले परंतु आंतरिक श्रद्धा

व सामाजिक, नैतिक आणि भावनिक विकासाला पायाभूत ठरणाऱ्या मूल्यांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे त्याचे 'श्रेयस्' हरवलेले दिसते. याचा परिणाम म्हणून तो माणूस 'सुधारला' परंतु मुळात 'अविकसित'च राहिला. नाही तर जीवनाच्या पोषणासाठी निर्माण केलेले विज्ञान त्याने विनाशासाठी वापरले नसते. निसर्गावर त्याचे स्वामित्व दिसत असले तरी तो स्वतः विकारवासनांचा गुलाम झाला. त्याचे सामर्थ्य वाढले परंतु पशुता कमी होऊ शकलेली नाही. परिणामी 'स्वास्थ्य' वाढले परंतु 'समाधाना'ला तो पारखा झाला. 'कसे जगावे' याचे उत्तर अभ्युदयपूर्वक हे असावे यात वाद नाही. यासाठी विज्ञान हे बहुमोल साधन होते. परंतु अभ्युदयाच्या उपासनेत मग्न झालेल्या या सुधारलेल्या माणसाने 'का जगावे? कशासाठी जगावे?' याचीही उत्तरे विज्ञानावर सोपवली. हे प्रश्न विज्ञानाच्या कक्षेत येत नाहीत. विज्ञानाला स्वतोमूल्य किंवा आंतरिक मूल्य मानले तर त्याचा परिणाम केवळ सुखोपभोगासाठी जगण्यात होतो; 'प्रेयस्' हेच मूल्य बनते; न्याय, सत्य, प्रेम, सामंजस्य व मांगल्य यांचा वेध घेणे विज्ञानाचे कार्य नव्हे. विज्ञान-निष्ठेतून, इंद्रियानुभव आणि बुद्धी यांच्या कवेत मावणारे विश्व हीच अंतिम सत्ता ही आग्रही भूमिका निर्माण होते. या ज्ञानशक्तीला मर्यादा असू शकतात. हे विसरले किंवा अमान्य केले तर श्रद्धा म्हणजे अंधश्रद्धा हे समीकरण स्वीकारावे लागते. परंतु व्यक्ती, समाज व सृष्टी यांच्या आंतरिक स्वरूपाचे मर्मज्ञान करून देणारी ऋतंभरा प्रज्ञा हा श्रद्धामय जीवनाचा श्रेष्ठ अविष्कार असतो. या प्रज्ञेचा उगम अंतःप्रतीतीत असतो. या अंतःप्रज्ञेची स्फुरणे म्हणजे भास किंवा निव्वळ कल्पनाविलास मानणे संपूर्ण जीवनावरील श्रद्धेचा पाया उखडून टाकणे आणि जीवनाला अभ्युदयकारक साधनमूल्यांच्या चौकटीत बंदिस्त करून टाकणे. निसर्गाला भोगभूमी मानण्याचा प्रमाद या अभ्युदयनिर्मित सामर्थ्यावरील अतिरिक्त विश्वासामुळे घडतो आणि खऱ्या धार्मिक श्रद्धेचा क्षय होतो.

हा क्षय होण्यात विज्ञानाप्रमाणे धर्माच्या नावाने वस्तुनिष्ठ ज्ञानाकडे दुर्लक्ष करणाऱ्या धर्माचा म्हणजेच 'धर्म म्हणजे अंधश्रद्धा' असे समीकरण मांडण्याच्या प्रवृत्तीचाही वाटा आहे. या प्रवृत्तीमुळे धार्मिक कर्मकांडाचे तात्त्विक समर्थन करण्यात धर्माची शक्ती वेचली जाते आणि मग मानवी जीवनातील धर्माचे कार्य 'प्रशासकीय' स्वरूपाचे होते; ईश्वर आणि मानव, व्यक्ती आणि समाज यांच्यामध्ये धर्मसंस्था मध्यस्थ बनून तिची कृपा हे धार्मिक विकासाचे अंग बनते. आणि मग आत्मिक विकासाऐवजी धर्माचरणातील बहिर्मुखता आणि बाह्य आचारभेद यांना महत्त्व प्राप्त होते. आणि मानवी चारित्र्याचा विकास साधण्याकडे आणि जीवनदृष्टी व्यापक आणि उदार करण्याचे महत्त्वाचे कार्य उपेक्षित राहते. समन्वयी जीवन-दृष्टीचा विकास घडविण्याचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवावयाचे असेल तर धर्माचे बहिरंग सामाजिक परिवर्तनाशी संवादी राखण्याची, सर्व धर्मांत समान असणाऱ्या आंतरिक मूल्यांचे प्रबोधन हेच धर्माचे सार म्हणून स्वीकारण्याची आणि धर्मप्रवर्तक व संत यांच्या साक्षात्कारी अनुभूतीला धर्माचे विशुद्ध अधिष्ठान मानण्याची काळजी घ्यावी लागेल. थोडक्यात 'कालबाह्य' ते वगळून 'कालोचित' निर्माण करण्याची आणि 'कालातीत' मूल्यांचे भान

ठेवून धर्म आणि समाजजीवन यांच्यात सुसंवाद निर्माण करण्याची खबरदारी घ्यावी लागेल.

साहजिकच 'अर्थ' आणि 'काम' यांच्याकडे दुर्लक्ष करून ज्याप्रमाणे चालणार नाही त्याचप्रमाणे केवळ त्यांचाच विचार करून समाजाची व धर्माची प्रगती होणार नाही हेही लक्षात घ्यावे लागेल. विज्ञानाने आजवर 'अर्थ व काम' या दोन पुरुषार्थांसाठी माणसाला साहाय्य केलेले आहे; ते आवश्यक असेल पण पुरेसे नाही. विज्ञानजन्य सामर्थ्याला आणि समृद्धीला ज्ञानाचे आणि नीतीचे अधिष्ठान नसेल तर त्यातून संपत्ती, सत्ता यांच्याबद्दलच्या अपेक्षांचीच वाढ होते व यातून अन्याय, जुलूम आणि विषमता अपरिहार्यपणे निर्माण होतात. म्हणूनच अर्थ व काम या पुरुषार्थांवर आधारलेल्या अभ्युदयात्मक व्यावहारिक जीवनाला धर्म आणि नीती यांचे अधिष्ठान देण्याचे कार्य भारतीय तत्त्वज्ञांनी केलेले आहे.

प्रत्येक धर्मप्रणाली व तत्त्वज्ञानप्रणाली आपापल्या भूमिकेतून मूल्यांचे प्रबोधन करीत असते. ऐंद्रिय आणि अतींद्रिय हे विश्वाचे विभाग नाहीत; मानवी मनाच्या सापेक्ष मर्यादांतून ज्ञानदृष्टीच्या त्या श्रेणी आहेत असेच मानणे योग्य. ऐहिक आणि पारलौकिक यांना मिळून होणारी 'समग्र सत्ता' लक्षात घेऊन ज्ञानेंद्रिये व बुद्धी यांच्या साहाय्याने होणारे सृष्टीचे ज्ञान म्हणजेच विज्ञान. आणि अंत:प्रज्ञेच्या माध्यमातून व्यक्ती व सृष्टी यांना अधिष्ठानभूत असणाऱ्या 'चिन्मय सत्ते' चे ज्ञान म्हणजे आत्मज्ञान असे म्हणणे योग्य. मानवी ज्ञानाची आणि जीवनाची अशी सम्यक् (Integral) मीमांसा विज्ञान आणि धर्म यांच्या व्यवस्थापनाला उपयोगी ठरते. अशी सम्यक् जीवनदृष्टी हे श्री. अरविंदांच्या दिव्य जीवनमीमांसेचे वैशिष्ट्यच. विज्ञान (Science) आणि साक्षात्कार (Mysticism) या मानवी ज्ञानप्रक्रियेच्या दोन बाजू; 'दु:खनिवृत्ती' आणि 'सुखप्राप्ती' याच उभयतांच्या प्रेरणा. ऐहिक दु:खांची निवृत्ती हे विज्ञानाचे प्रयोजन व ऐहिक दु:खे आणि त्यामागची पारलौकिक कारणे यांचा निरास हे साक्षात्काराचे प्रयोजन. जड आणि चेतन यांत मानला जाणारा भेदही आज विज्ञानाला मान्य नाही हे लक्षात घ्यावे लागेल.

"There is no place in this new kind of physics both for field and matter; for the field is the only reality". आणि All Science in transcendental or else passes away ... Botany is now acquiring the right theory" असे उद्‌गार काढणारा आईनस्टाईन आणि "A vital aspect of this enlightened state is the experience of an all-forwarding unity. This and that no longer are separate entities, they are different forms of the same thing. Every thing is a manifestation. It is not possible to answer manifestations of what because the what is that beyond words, beyond concept, beyond form, beyond even space and time. Everything is a manifestation of that which is beyond these words lies the experience the experience is that which is असे लिहिणारा The Dancing Wu Li Masters चा लेखक गॅरी झुकोव्ह हे शास्त्रज्ञ धर्मप्रवर्तक साक्षात्कारी आणि पूर्णप्रज्ञ अशा श्रीरामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद यांच्या भूमिकेवर येऊन पोचलेले दिसतात. सर्व प्रकारच्या धर्मप्रणाली, उपासनापद्धती

आणि संप्रदायप्रणाली भारतात आढळून येतात; तरीही

यं शैवा: समुपासते शिव इति ब्रह्मेति वेदान्तिनो ।
बौद्धा बुद्ध इति प्रमाणपटव: कर्तेति नैयायिका:।
अर्हन्नित्यथ जैनशासनरता: कर्मेति मीमांसका:।
सोऽयं नो विदधातु वाञ्छितफलं त्रैलोक्यनाथो हरि:।

अशा परिभाषेत भारतीय जीवनदृष्टीने एकात्मतेला महत्त्व दिलेले दिसते. ज्ञानेश्वरांसारख्या संतांनी 'भूतां परस्परे जडो मैत्र जीवांचे' या शब्दांत विश्वात्मक बंधुभावाचे 'पसायदान' मागितले. हा मुक्त मानवाचा धर्म किंवा विश्वधर्म. यात आत्मा हा पूजक आणि विश्व हा पूजाविषय; करुणा, प्रेम, त्याग, न्याय आणि सेवा ही पूजेची साधने. मुक्त मानवाने केलेली व्यक्ती व समाजविषयक स्वधर्मरूपी किंवा स्वकर्तव्यरूपी पूजा हा विशुद्ध धार्मिक श्रद्धेचा मूल स्त्रोत. हे धर्मकार्य केवळ मंदिरात घडत नसते; विशिष्ट पवित्र ग्रंथाच्या आधारे घडले पाहिजे असेही नाही. व्यक्ती, समाज आणि सृष्टी यांच्या जीवनात सौंदर्य, मांगल्य निर्माण करून विकास घडवून आणणे हे व्यापक अर्थाने धर्मकार्य. 'ऋतंभरा' प्रज्ञा असणाऱ्या प्रतिभावंतांना ऐहिक आणि पारलौकिक यांच्या समग्रतेचे दर्शन घडलेले असते. सान्त, दृश्य विश्वाचे स्वरूप व मर्यादा त्यांना माहीत असतात व अनंत सृष्टीची वास्तवताही त्यांना ज्ञात असते. 'दृश्यते त्वग्र्या बुद्ध्या सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभि:' (कठोपनिषद् १.३.१२) यामुळे आत्मा, ईश्वर, परलोक हे त्यांना 'भ्रम' किंवा 'बौद्धिक गृहीत तत्त्वे' वाटत नाहीत. ऐहिकता आणि पारलौकिकता या उभयतांपासून मुक्ती त्यांना अभिप्रेत असते; या दोन्हींच्या पलीकडे जाणारी निरुपाधिक परमसत्ता हे त्यांचे परममूल्य असते. वास्तव आणि आदर्श, कालात्मक आणि कालातीत, ऐहिक आणि पारलौकिक यांचा नित्यानित्यविवेक ही या भूमिकेची प्रेरणा. या भूमिकेतून व्यक्ती, समाज आणि सृष्टी हे एकात्म दिव्यतेचे अविष्कार आहेत याची प्रतीती येते व कर्म, भक्ती, योग आणि ज्ञान यांचा जीवनात समन्वय होतो. ऐकात्म्याचे हे तत्त्वज्ञान या विश्वधर्माला प्रेरणा प्रदान करते. अशी विशुद्ध धर्मदृष्टी हे 'धर्मसार' ठरते आणि धर्म व तत्वज्ञान यांचा संगम घडतो. The Concept of Man या डॉ. राधाकृष्णन आणि पी. टी. राजू यांनी संपादित केलेल्या ग्रंथात 'To discuss the content of the concept of man ... to obtain insight into the full nature of man' हा ध्रुवतारा मानलेला आहे आणि त्यांनी म्हटल्याप्रमाणे 'We need a true philosophy of man' ही आजची गरज आहे. ती पूर्ण करण्याची प्रेरणा मिळून 'मुक्त मानवाचा धर्म' स्थापन करण्यासाठी 'समाना हृदयानि व:' ची शुभेच्छा प्रकट करून आपली रजा घेतो.

❖ ❖ ❖

# भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (१६)
# उत्तर भारतीय देवालयांचे मंडप

**डॉ. र. पु. कुलकर्णी**

उत्तर भारतीय देवालयांचे मंडप दक्षिण भारतीय देवालयांच्या मंडपांपेक्षा आकाराने लहान असतात. हजार खांबी मंडप येथे बघावयास मिळणार नाहीत. तसेच दक्षिण भारतीय देवालयांची आवारे खूप मोठी असून तेथे देवालयांपासून दूर, वेगळे, सुटे असे मंडप असतात. उत्तर भारतीय देवालयांची आवारे त्या मानाने लहान असून तेथे सुटे मंडप नसतात. उत्तर भारतीय देवालयातील मण्डप हे गर्भागाराला व एकमेकांना चिकटून व एका पाठोपाठ असतात. या सर्वांचा सममितिअक्ष एकच असतो. या देवालयात सरासरी गर्भागार व त्यापुढे तीन मंडप अशी रचना असते. देवालय फार भव्य प्रमाणात बांधलेले असेल तर मंडपांची संख्या पाचापर्यंत देखील वाढते. ओरिसा राज्यातील काही देवालयांना उदा. राजराणी, पाच मंडप आहेत.

गर्भागाराजवळ चारी बाजूंनी भिंती असलेला मोठा मंडप असतो. हा मंडप भिंतींनी झाकलेला असल्यामुळे त्यास 'गूढमंडप' म्हणतात. गर्भगृह व गर्भमंडप हे परस्परांना काही वेळा जोडलेले असतात; म्हणजेच गूढमंडपातून बाहेर पडण्यासाठी व गर्भगृहात शिरण्यासाठी त्यांना जोडणारा एकच दरवाजा असतो. मात्र बहुतेक मंदिरांत गर्भागार व गूढमण्डप यांना जोडणारा एक बोळवजा मंडप असतो. त्याला 'अंतराळ' मंडप म्हणतात. जणू गर्भागारात देवमूर्तीचा वास असल्याने ते स्वर्गात असते व गूढमंडप जेथे देवदर्शनाकरिता भक्त जमतात तो या पृथ्वीवरचा असतो. स्वर्ग आणि जमीन यांना जोडणारा तो अंतराळ मंडप. आकाश, अंतराळ व पृथ्वी असे तीन लोक ऋग्वेदकालापासून मानले गेले आहेत. त्यांचीच जणु प्रतिकृती येथे मंदिरात आहे.

अंतराळ मंडपाची लांबी त्याच्या रुंदीपेक्षा काही वेळेला जास्त असते म्हणूनच त्याला वरती बोळवजा मण्डप म्हटले आहे. हा मंडप देखील भिंतींनी झाकलेला असतो. मात्र त्याला खिडक्याच काय पण झरोकादेखील ठेवलेला नसतो. या मंडपात शिरण्यासाठी गूढमंडपाला दार असते. व या मंडपातून गर्भागारात जाण्यासाठी पुन्हा दरवाजा असतो किंवा नसतो. या मंडपाला बाहेरून दिसणारे शिखर नसते. भलेमोठे दगड परस्परांवर काटकोनांत रचून मंडपाचे छप्पर बांधतात. या मंडपाच्या छपराला आतल्या बाजूला नक्षीदार वितान असते. याच्या शिखरावर उत्कृष्ट नक्षी केलेली शुकनास असते किंवा दगड पायऱ्यांसारखे एकमेकांवर ठेवून शिखराची उंची वाढवितात. त्याच्यावर सिंहाची मूर्ती असते.

अंतराळमंडपावरील शिखराची, छपराची, रचना समजून घेण्यासाठी नाशिक येथील काळ्यारामाच्या मंदिराला भेट द्यावयास हवी. येथे सिंहाच्या मूर्तीखाली नक्षी कोरलेली नाही. नुसते पायऱ्यांप्रमाणे दगड ठेवलेले आढळतात. शुकनासीची उत्कृष्ट नक्षी पहावयाची असेल तर अंबरनाथ येथील शिवालयाला भेट द्यावयास हवी. नाशिकजवळील सिन्नर येथील गोंडेश्वराच्या (गोविंदेश्वराच्या) देवालयाची शुकनास देखील रेखीव नक्षीने भूषविलेली आहे.

अंतराळमंडपाच्या भिंतीची जाडी गर्भागाराच्या भिंतीच्या जाडीइतकीच असते किंवा काही वेळा तिच्यावर उंच शिखराचे वजन नसल्याने या भिंतीची जाडी, गर्भगृहाच्या भिंतीच्या जाडीच्या निम्मे किंवा पाऊणपट असते. गर्भागाराच्या भिंतीवर आंतून काहीही नक्षी कोरलेली नसते त्याचप्रमाणे अंतराळमंडपाची भिंत आतल्या बाजूने कोणत्याही भूषणाशिवाय असते. अंतराळमंडपाच्या भिंतीच्या बाहेरील बाजूवरील थरविभाग हे गर्भगृहाच्या भिंतीच्या बाहेरील थरविभागांशी मिळते जुळते असतात.

दुसरा मंडप म्हणजे गूढमंडप. हा मंडप आकाराने मोठा असतो. सर्वसाधारणपणे त्याची रुंदी गर्भागाराच्या रुंदीइतकीच असते. परंतु गूढमंडपाची रुंदी गर्भगृहाच्या


रुंदीपेक्षा १ १/४, १ १/३, १ १/२ किंवा दुप्पट असू शकते. नागर देवालयांत गूढमंडपाची रुंदी गर्भगृहाच्या रुंदीच्या दुपटीपेक्षा जास्त ठेवत नाहीत. गूढमंडप नेहमीच चौरस आकाराचा असतो, तेव्हा त्याची लांबी त्याच्या रुंदीइतकीच असते. सौंदर्यशास्त्रदृष्ट्या गूढमंडपाच्या रुंदीबद्दल नियम असा की गूढमंडप इतका भव्य नसावा की त्याच्यापुढे गर्भागार फिके दिसू लागेल किंवा लोपल्यासारखे होईल.

कोणत्याही देवालयातील सर्वांत सुंदर, नक्षीपूर्ण आणि भव्य असा भाग गूढमंडपाचाच. या मंडपात खांब असतात. दक्षिण भारतीय मंदिरातील मंडपांइतके येथे जरी खांबांचे एवढे प्रस्थ नसले तरीही जे काही मोजकेच खांब असतात ते लता, वेली, मोत्यांचे हार, त्याच्या मध्यभागी असलेल्या कोनाड्यातील मूर्ती वगैरेंच्या कोरीव कामामुळे फार सुंदर दिसतात. किंबहुना 'मण्डयतीति मण्डप' जो शोभा निर्माण करतो, जो भूषवितो, अलंकरण करतो तो मण्डप अशी जी मण्डपाची कारिका सांगतात ती या खांबांवरील सुरुचिपूर्ण नक्षींनी योग्यच आहे अशी खात्री मण्डप पाहणाऱ्याला होते. मण्डपाच्या भिंती आतून साध्या असतात. त्यांच्यावर काहीही नक्षीकाम केलेले नसते. मात्र या भिंतींमध्ये जे खांब असतात, ज्यांना 'कुडमस्तंभ' म्हणतात, ते मण्डपातील सुट्या खांबांप्रमाणेच अनेक अलंकारांनी व नक्षींनी सजविलेले असतात. खांबावरती डोळ्यांच्या समपातळीत मूर्ति कोरलेल्या असतात. या मूर्ती देवादिकांच्या किंवा चरित्रातील नाट्यपूर्ण प्रसंग दाखविणाऱ्या असतात. महिषासुरमर्दिनी, हिरण्यकशिपूचे पोट फाडणारा नृसिंह, सीतास्वयंवराच्या वेळी शिवधनुष्यावर प्रत्यंचा चढविण्याचा प्रयत्न करणारा राम वगैरे मूर्ती येथे कोरलेल्या असतात. या मूर्ती अर्थातच लहान आकाराच्या असतात.

गूढमंडपाची भिंत आतून भूषणविरहित असली, तीवर कोठलेही नक्षीकाम केलेले नसले तरी बाहेरून मात्र या भिंती गर्भगृहाच्या भिंतीप्रमाणे थरविभागांनी भूषविलेल्या असतात. सर्वसाधारण देवालयांत भिंतीच्या जंघा भागांत मूर्ती असल्या तरी त्या गर्भागाराप्रमाणेच भिंतींच्या लांबीच्या मध्यभागी कोनाड्यात ठेवलेल्या असतात. परंतु काही मोठ्या मंदिरांत या जंघाभागात मूर्ती परस्परांना लागून ओळीने ठेवलेल्या असतात. मंदिर ज्या देवमूर्तीकरिता बांधलेले असते त्या देवाचे जणू सर्व चरित्रच किंवा अनेक अवतारांच्या मूर्ती येथे कोरलेल्या असतात. देवालयाच्या भिंतीचे थरविभाग जर 'मेख' प्रकारचे असतील तर जंघांची संख्या एकावर एक अशी दोन किंवा तीन देखील असते. या प्रत्येक जंघेवर अनेक देवमूर्ती कोरलेल्या असतात. सामान्यत: खालच्या जंघेवर तिची उंची जास्त असल्यामुळे देवाची उभी (स्थानक मुद्रेतील) मूर्ती कोरतात व वरच्या जंघेवर, तिची उंची तुलनेने कमी असल्याने बसलेल्या (आसनमुद्रेतील) मूर्ती असतात. मण्डपाच्या भिंतीवरील मूर्तिकामाची यथायोग्य कल्पना येण्यासाठी मराठवाड्यातील औंढ्या येथील नागनाथाचे मंदिर किंवा सौराष्ट्रातील सोमनाथाचे मंदिर बघावयास हवे. औंढ्या नागनाथ येथील देवालय हे शिवालय आहे. त्यामुळे मंडपाच्या भिंतीवर शंकराच्या अनेक रूपांतील मूर्ती येथे कोरलेल्या दिसतात. शंकराची चंद्रशेखर मूर्ती, वृषभारूढ मूर्ती, उभा, स्कंद याच्यासह शिव (सोमास्कंद शिव) अशा अनेक मूर्ती तसेच भैरवाच्या, भिक्षाटनाच्या स्वरूपातील शंकराची अनेक रूपे येथे कोरलेली आढळतात. शिवपार्वतीच्या मूर्तीत त्यांची तोंडे परस्परांस सन्मुख अशी दाखवितात पण येथे शिवापासून उलट दिशेकडे पाहणारी, रुसलेली, पार्वती देखील दाखविलेली आहे. दक्षिण दिशेकडील भिंतीच्या जवळ जवळ मध्यभागी असलेली भैरवरूप शंकराची मूर्ती कलाकाराने फारच देखणी कोरली आहे. याशिवाय विष्णू व ब्रह्मा यांच्या मूर्ती, तसेच ब्रह्मा, विष्णू व आणि महेश अशा तिन्ही मूर्ती जवळ जवळ ठेवलेल्या देखील आढळून येतात. या मंदिराच्या भिंतींना दोन जंघा आहेत. खालच्या जंघेवर असलेल्या सर्व स्थानकमुद्रेत आहेत तर वरच्या जंघेवर कोरलेल्या मूर्ती आसनमुद्रेत आहेत. इंद्र, सप्तमातृका, गणपती वगैरेंच्या मूर्ती देखील येथे खोदलेल्या आहेत.

मंडपाचे शिखर अर्धगोल आकाराचे असते; म्हणजेच त्याची उंची मंडपाच्या रुंदीच्या निम्मी असते. मंडपाचे शिखर अंतर्बाह्य कोरीव काम करून सुशोभित केलेले असते. गूढमंडप हा नेहमी चौरसाकृती असतो. मंडपाच्या भिंतींच्यावर लांब तुळ्यांच्या स्वरूपांतील दगड अष्टकोनी आकारांत ठेवतात; त्यांच्या वरील थरविभागांत

ते सोळाकोनी आकृतिबंधांत असून त्यावरचा थर वर्तुळाकार असतो. हे दगडांचे थर एकमेकांवर ठेवताना त्यांचा काही भाग आतमध्ये घातलेला असतो. वर्तुळाकृती थरावरील सर्व थर वर्तुळाकृती असून त्यांचे दगड काहीसे आतमध्ये आणलेले असतात. त्यामुळे जसजसे वर जाऊ तसतसा वर्तुळाचा व्यास कमी होत जातो. सर्वांत वरच्या शेवटच्या वर्तुळाचा व्यास इतका लहान असतो की एकाच शिळेने तो भाग झाकता येतो. सामान्यत: यासाठी दगडाचे कमीत कमी पाच, सहा तरी थर एकमेकांवर ठेवावे लागतात. अर्थात थरांची संख्या मंडपाच्या रुंदीवर व शिळा किती मोठ्या आकाराच्या मिळू शकतात यावर अवलंबून असते.




आकृती १ : शिखराचा अंतर्भाग

मंडपाच्या शिखराच्या आतल्या भागाच्या थरविभागांची कल्पना आकृती १ वरून येऊ शकेल. मंडपाच्या शिखराच्या उंचीचे ३५ भाग करतात. यांतील सर्वांत खालच्या थराला 'दर्दरिका' म्हणतात व त्याची उंची सात भाग, म्हणजेच शिखराच्या एकूण उंचीच्या १/५ असते. त्यावरील 'रूपकंठाचा' थर पाच भाग उंच असतो. याच्यावर, शिखराच्या उंचीनुसार दोन, तीन किंवा चार थर असतात त्यांना 'गजतालु' म्हणतात. सर्वांत वरच्या थराला 'करोट' म्हणतात व त्यात शिखराच्या वरचा भाग झाकून टाकणाऱ्या शिळेला अंतर्भाव होतो. करोटाची उंची पाच भाग असते.

रूपकंठाच्या थरविभागावर विद्याधरांच्या मूर्ती कोरलेल्या असतात. त्यांची संख्या आठ, बारा, सोळा, चोवीस किंवा बत्तीस असते. विद्याधरांच्या मूर्तींच्या वर गजतालू विभागात तिरप्या उभ्या दगडांवर स्वरूपसुंदर नर्तकी खोदलेल्या असतात. त्यांची संख्या आठ किंवा बारा असते. सर्वांत वरची जी शिला असते तिला झुंबराच्या आकाराचे लोंबते वितान असते. नागर पद्धतीच्या देवालयांच्या मंडपाच्या शिखराच्या आतल्या भागाची रचना याप्रमाणे असते. नाशिक येथील काळ्या रामाच्या मंदिराच्या मंडपावरील शिखर या प्रकारचे आहे. मात्र झुंबराच्या किंवा लोंबत्या कमळकळीच्या वितानाच्या नक्षीसाठी तसेच विद्याधर व रूपवान अप्सरांच्या मूर्तींसाठी अबू येथील कलापूर्ण नक्षींनी सजविलेली देवालये पहावयास हवीत. चाफळ (सातारा जिल्हा) येथे मफतलाल यांनी नवीन श्रीराममंदिर बांधले आहे. तेथील मंडपाच्या शिखराच्या आतल्या भागात हे मूर्तीकाम तसेच कमळाच्या कळीचे भूषण दृष्टोत्पत्तीस येते. पुणे येथील सारसबागे-समोरील महाकाली, महालक्ष्मी व महासरस्वतीचे देवालय आहे, त्याच्याही (उघड्या) मंडपाच्या अर्धगोलाकृती शिखराच्या आतल्या भागी अप्सरांच्या मूर्ती दिसून येतात.

मंडप चौरस असतो व शिखर वर्तुळाकृती असते, तेव्हा कोपऱ्याचा जो भाग असतो तेथे सिंहमुखाची कीर्तिमुखाची, आकृती कोरलेली असते; किंवा देवदानवांनी समुद्रमंथन केले तो प्रसंग कोरून काढलेला असतो. एखाद्या देवालयाचा मंडप जेव्हा पहाल तेव्हा तेथील खांब, कुडमस्तंभ तसेच शिखराच्या आतील भागीवरील ही नक्षी सूक्ष्मपणे व जाणतेपणे बघावयास विसरू नका. देवालय बघावयाचे म्हणजे एखादी प्रखर विजेरी जवळ असणे यासाठी आवश्यक असते.

शिखराच्या बाहेरील बाजूवरील अलंकरण आकृती २ वरून समजून येईल. शिखराच्या या अलंकरणास 'संवरणा' म्हणतात. आकृती २ मध्ये शिखराचा ऊर्ध्वच्छंद व निम्मा अधोच्छंद दाखविला आहे. त्यावरून शिखराच्या बाहेरील भूषण कसे असते त्याची कल्पना येईल. परंतु शिखराची ही रचना, ते प्रत्यक्ष पाहिल्यास लवकर समजेल. नाशिक शहरात गोदावरी नदीच्या काठी 'रामसेतू' पाशी असलेल्या नारोशंकराच्या मंदिराच्या गूढमंडपाचे व बाहेरील मुखमण्डपाचे शिखर या प्रकारचे आहे. या मंदिराभोवती जो कोट आहे त्याच्या भिंतीवर चढून जाण्यासाठी भिंतीतच जिने आहेत. तेव्हा भिंतीवर चढून मंडपाच्या शिखराच्या बाहेरील बाजूची रचना व अलंकरण जवळून पाहता येते.



आकृती २ : शिखराची संवरणा



आकृती ३ : समतल वितान



आकृती ४ : उदित वितान




आकृती ५ : क्षिप्ताक्षिप्त वितान

नाशिकजवळील सिन्नर येथे गोंडेश्वराचे मंदिर आहे. त्याचे देखील मंडपाचे शिखर याच प्रकारच्या अलंकरणाने भूषविलेले आहे.


मंडपाच्या शिखराचा आतल्या भागाला उत्कृष्ट नक्षीकाम केलेले वितान असते. त्याचे नक्षीच्या प्रकारावरून समतल, उदित व क्षिप्ताक्षिप्त असे तीन प्रकार आहेत. जेथे सपाट शिळेवर नक्षी कोरलेली असते. (आकृती ३) त्याला 'समतल' वितान म्हणतात. जेथे शिखराच्या आतल्या बाजूला थरविभाग आहेत, दर्दरिका, गजतालु, करोट वगैरे, व ते नक्षींनी सजविलेले असतील त्याला 'उदित' म्हणतात (आकृती ४) परंतु जेथे कोरीव काम खूप उठावाचे केलेले असते त्यास 'क्षिप्ताक्षिप्त' वितान म्हणतात (आकृती ५) उदित वितानाची उदाहरणे दिली आहेत. उत्कृष्ट समतल वितानाचे उदाहरण द्यावयाचे तर ते नाशिकजवळील सिन्नर येथील ऐरावतेश्वराच्या मंदिरातील अंतराळमंडपाच्या वितानाचे देता येईल. येथे वितानाचे नऊ भाग केले असून त्यांत त्या त्या दिशांना असलेले दिक्पाल वाहनांसकट कोरलेले आहेत.

गूढ मंडपाचे शिल्पशास्त्राच्या ग्रंथांत अनेक प्रकार




आकृती ६ : वर्धमानादि

दिले आहेत. 'दीपार्णव' या सौराष्ट्र शैलीच्या मंदिरांची माहिती देणाऱ्या ग्रंथांत 'वर्धमान' ते 'कैलास' प्रकारच्या मंडपाची माहिती दिली आहे. (आकृती ६) भद्र, उपभद्र वगैरे भूषणांनी या मंडपांचे निरनिराळे प्रकार होतात. मंडप चौरस असून त्याच्या पुढच्या बाजूला जर भद्र असेल तर त्यास 'वर्धमान' मंडप म्हणतात. त्याच्या चारही दिशांना भद्र असतील तर त्यास 'स्वस्तिक' प्रकारचा मंडप म्हणतात. गरुड मंडपात चारही बाजूंना भद्र असतात. अशीच प्रतिभद्रांची संख्या वाढवीत नेण्याने निरनिराळ्या प्रकारचे मंडप होतात.




आकृती ७ : शिवनादादि मंडप
(दीपार्णव १०.६०-६६)


अबू येथील देवालयांत भिंती नसलेले मंडप आहेत. त्यांच्या खांबाची रचना आकृती ७ मध्ये दिली आहे. खांबांच्या निरनिराळ्या मांडणीप्रमाणे त्यांना 'शिवनाद' ते 'मेघनाद' अशी नावे आहेत. याशिवाय नागर देवालयांत नृत्यमंडप असतात. या नृत्यमंडपांत देवाची भक्ती म्हणून भक्त देवाला आपले नृत्यकौशल्य दाखविण्याची पराकाष्ठा करतो. सर्वांत लहान मण्डप चार खांबांचा असतो परंतु त्यांत दोन दोन खांबाची भर टाकून त्यांचे अनेक प्रकार होतात. सर्वात मोठ्या नृत्यमंडपाला ६४ खांब असतात (आकृती ८) मंडपांचे असे अनेक प्रकार उत्तर भारतीय देवालयांची माहिती देणाऱ्या शिल्पशास्त्राच्या ग्रंथांत वर्णिलेले असतात. दोन किंवा तीन मजली देखील मंडप असतात. दोन मजली मंडपाचे उत्तम उदाहरण म्हणजे उज्जैन येथील महाकाळेश्वराच्या मंदिराचा मंडप होय.



आकृती ८ : मूल मंडप




आकृती ९ : मुख मंडप



आकृती १० : मुख मण्डप-गोंडेश्वर-सिन्नर

याशिवाय सर्वांत पुढच्या बाजूला एक छोटा मंडप असतो. याला 'मुखमंडप' म्हणतात. हा मण्डप जवळ जवळ उघडाच असतो. मंदिराच्या पायऱ्या चढून वर आले की प्रथम हा मुखमंडप लागतो. याला त्याचा आकार लहान असल्याने अर्धमंडपही म्हणातात. नाशिक येथील काळ्या रामाच्या देवळाचा मुखमंडप, तसेच सिन्नर येथील गोविंदेश्वराच्या मंदिराचा मुखमंडप ही त्याची दोन उदाहरणे आहेत. गोविंदेश्वराच्या मुखमण्डपावरील नक्षीकाम उत्तम आहे. या मंडपाचे थरविभाग आकृती ९ मध्ये दाखविले आहेत. यातील वेदिका व मत्तवारण या थरविभागांवर मूर्ती व अनेक अलंकारपूर्ण छोटे छोटे खांब यांची उत्कृष्ट नक्षी असते.

मुखमंडपाला सामान्यत: दोन खांब असतात. तो जर आकाराने मोठा असेल तर त्याला चार खांब देखील असू शकतात. या मंडपाच्या शिखराची रुंदी लहान असल्याने आतल्या बाजूला मोठ्या शिळा एकमेकांवर काटकोनांत बसवितात व शिखराच्या बाहेरची नक्षी 'संवरणा' प्रकारची असते. नाशिक येथील नारोशंकराच्या देवालयाच्या मुखमंडपाच्या तसेच सिन्नर येथील गोविंदेश्वराच्या देवालयाच्या मुखमंडपाच्या शिखराचे अलंकरण संवरणा प्रकारचे आहे.

नागर प्रकारच्या किंवा उत्तर भारतीय देवालयाच्या मंडपांची माहिती येथे दिली आहे. त्यावरून या मंडपांचे सूक्ष्म निरीक्षण कसे करावे याची कल्पना वाचकांस यावी.

• • •

# अतींद्रिय शक्तीचे भय, कोणास वाटते का ?

श्री. व. वि. अकोलकर

काही दिवसांपूर्वी जरा लहरी स्वभावाचे चाळिशीचे गृहस्थ मजकडे आले. स्वत:च्या अतींद्रियक्षमतेविषयीचे त्यांचे बोल ऐकल्यावर मी म्हटले की प्रयोगशीलतेकडे माझा कल असतो. माझे हे अप्रत्यक्ष आह्वान त्यांना जाणवले व त्यांनी एखाद्या व्यक्तीचे छायाचित्र मागितले. वयाच्या १८ व्या वर्षी काढलेले परंतु प्रत्यक्षात ३१ वय असलेल्या तरुणाचे रंगीत पासपोर्ट आकाराचे छायाचित्र त्यांना दिले व होकारार्थी वा नकारार्थी भाव न दर्शविता मी शांतपणे बसलो. ते गृहस्थ एक एक विधान करू लागले. "ही व्यक्ती हुशार आहे. सुस्वभावी आहे." ही विधाने बरोबर असली तरी कुणालाही बरे वाटावे अशा स्वरूपाची, म्हणून खास महत्त्व देण्यासारखी वाटली नाहीत. पुढे ते म्हणाले. (१) " या व्यक्तीला तीन क्षेत्रांत गती आहे". थोड्या वेळाने ते ठामपणे म्हणाले (२) "हा माणूस मेडिसिनच्या (वैद्यकीय क्षेत्रातील) आहे". काही सेकंद गेल्यावर उजव्या हाताची तर्जनी जोराने हलवीत ते पुटपुटू लागले (३) फ्लॉरिडा, अँटलांटा फ्लॉरिडा, अँटलांटा..." व एकदम म्हणाले. (४) हा फ्लॉरिडामध्ये आहे". ही चारही विधाने बरोबर होती. तो कलावंत आहे, कविता करतो, वैद्यकाचा अभ्यास करीत होता. तो फ्लॉरिडातच वैद्यकाचा उच्चपदवीधर होता. ह्यानंतर काही दिवसांनी त्याचा फ्लॉरिडामधून टेलिफोन आल्यावेळी मी त्याला विचारले तेव्हा त्याने सांगितले की काही दिवस तो फ्लॉरिडा व अँटलांटा प्रांताच्या एका हॉस्पिटलमध्ये काम करीत होता.

अज्ञात व्यक्तीचे छायाचित्र हातात धरून त्या व्यक्तीविषयीची अचूक विधाने करणारे स्त्रीपुरुष काही वाचकांच्या नजरेस आले असतील, परंतु अशा हकिकतींची नोंद ठेवण्यात येत नाही ही खेदाची गोष्ट आहे.

हरवलेली वस्तू अथवा व्यक्ती 'या क्षणी' कोठे आहे हे चित्त एकाग्र करून सांगणाऱ्या पीटर हर्कोस सारख्या व्यक्ती देशोदेशी आढळल्या आहेत. त्यांची मदत पोलिसांनीही घेतल्याचे नमूद आहे. गुन्ह्यांच्या तपासाच्या कामी देखील त्यांची मदत झालेली आहे. अनोळखी व्यक्तीचा चेहरा पाहून व नंतर तिला पडद्याआड बसवून तिच्याशी संबंधित अशा घटना सांगणाऱ्या व्यक्तीही आढळतात. हस्तस्पर्शाने, दृष्टिक्षेपाने अथवा केवळ मन:संकल्पाने वनस्पतींवर वा प्राण्यांवर परिणाम घडवून आणल्याची प्रयोगसिद्ध उदाहरणे आहेत. इष्टानिष्ट भावी घटना अगोदरच सांगण्याची क्षमता काहीजणांच्या अंगी आढळते. कधी कधी, एका व्यक्तीच्या मन:स्थितीचे दूरस्थ व्यक्तीपर्यंत मनोमन संक्रमण होते.

सामान्य क्षमतांहून भिन्न अशा या विविध अतींद्रिय क्षमतांची वाचक म्हणून 'साय्' (psi) ही संज्ञा रूढ झाली आहे. $\phi$ हे ग्रीक वर्णमालेतील अक्षर असून त्याचा उच्चार 'साय्' आहे. 'साय' च्या बाबतीत चार वेगवेगळ्या भूमिका अंगीकारण्यात आलेल्या आहेत. (१) प्रत्यक्ष उदाहरणांचा आधार घेणारी अस्तित्ववादी भूमिका (२) संशोधनपर भूमिका (३) संशयवादी भूमिका (४) नास्तिवादी प्रचाराची भूमिका. संशोधन करणारी मंडळी. 'साय' मूलक अनुभवांचे वर्गीकरण करतात, जिच्या ठायी ही अतींद्रिये क्षमता असल्याचे आढळते अशी व्यक्ती प्रयोगात्मक संशोधनासाठी घेतात, ही क्षमता कार्यान्वित होण्यास अनुकूल असे कोणते घटक, हे निश्चित करण्याचा प्रयत्न करतात. (अनुवंश, व्यक्तित्वगुण, मनाची अवस्था इ.) संशयवादी भूमिका सत्यशोधनाला अप्रत्यक्षपणे मदत करीत असते. या कारणास्तव ती स्वागतार्हच असते. संशयवादी अतींद्रियमानसशास्त्रीय संशोधनांची समीक्षा करू शकतात, विधायक सूचनाही करू शकतात, आणि त्या संशोधनांचा जनतेस परिचयही करून देऊ शकतात. The Humanist नामक अमेरिकेतील संघटना व तिची 'Committee for Scientific Investigation of the Claims of the

Paranormal' (CSICOP) यांचे उद्दिष्ट हेच आहे व त्या संघटनेचे अध्यक्ष प्रा. पॉल कुर्टझ (Kurtz) यांनी ते स्पष्ट केले आहे. १९६८ मध्ये त्यांनी म्हटले आहे की, ''ह्यूमॅनिस्ट संघटनेच्या समितीचा इरादा परासमानसशास्त्रावर सर्वतोपरी हल्ला चढविण्याचा नाही.'' त्या समितीचे सदस्य रे. हायमन (Hyman) यांनी चार्लस ऑनर्टन (Honorton) यांचा गँझफेल्ड (Ganzfeld) प्रयोग अहवाल तपासून विधायक सूचना केल्या ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. काही संशयवादी मात्र बुद्धिवादाचे बिरुद मिरवीत अंधश्रद्धा निर्मूलनाच्या नावाखाली परासमानसशास्त्राविरुद्ध प्रचार करतात. बुवाबाजीविरुद्धची स्वागतार्ह मोहीम आणि मानसशास्त्रीय संशोधनाचे परिचयपूर्वक समीक्षण यांमधील भेद या प्रचारकांना कळत नाही.

दूरवरील वस्तुस्थिती, दूरस्थ प्रियव्यक्तीच्या मनाची अवस्था, भावी घटना, अतींद्रियरीत्या कळण्याचे स्वतःला अनुभव आलेल्या काही जणांना स्वतःच्या ठायी असलेली ही क्षमता विकास पावावी असे वाटते; तिचे भय तर मुळीच वाटत नाही. इतरांना मात्र अतींद्रियक्षमतांचे भय वाटते व ती असू नयेसे वाटते. संशयवाद्यांना असे काही भय वाटत असणे संभवनीय आहे. नास्तिवाद्यांच्या विरोधाचे व प्रचाराचे मूळही अशाच भीतीमध्ये असू शकेल. अतींद्रिय क्षमता स्वतःच्या तसेच इतर कोणाच्या ठायी नसलेल्याच बऱ्या असे पुष्कळजणांना वाटते. त्यांमध्ये खुद्द परामानसशास्त्रीय संशोधन करणारेही असू शकतात असा निष्कर्ष मानसशास्त्रज्ञ व 'Transpersonal Psychologies' ग्रंथाचे लेखक प्रा. चार्लस टार्ट ( कॅलिफोर्निया विद्यापीठ) यांनी एका प्रयोगावरून काढला आहे. परासमानशास्त्रज्ञांच्या एका सभेपुढे केलेल्या भाषणाच्या सुरुवातीस त्यांनी श्रोत्यांना विचारले: ''मी'' 'टेलेपॅथिन' नामक औषध बनविले आहे; त्याच्या सेवनाने १०० यार्डांच्या परिसरातील प्रत्येक व्यक्तीचे विचार व भावना कळू शकतात. ते कोणास हवे आहे काय?'' एकाही श्रोत्याने हात वर केला नाही' (C. Tart: "Who is afraid of Psychic Powers? Me ?", (ASPR Newsletter))

अतींद्रिय शक्तीविषयी वाटणाऱ्या भीतीची मानस विश्लेषणात्मक कारणमीमांसा प्रा. डॉ. टार्ट यांनी केली आहे. अमेरिकन संस्कृतीस अनुलक्षून ती कारणमीमांसा आहे. तथापि इतर समाजांच्या बाबतीत देखील ती लागू पडण्यासारखी आहे.

**डॉ. टार्ट म्हणतात :**

''या भीतीचे एक कारण असे असावे: माणसांचे परस्परांशी वागणे, तसेच त्यांचा एरव्हीचा सामाजिक व्यवहार यांच्या मुळाशी एक प्रकारचा करार Contract असतो; तो असा: 'मला वाटत असते की मी तुम्हाला असा असा दिसावा. माझी ती प्रतिमा इतरांच्या मनात राहावी हे ठरविण्यात आपण पटाईत असतो हे खरे. परंतु दुसऱ्या व्यक्तीची जी प्रतिमा आपण आपल्या मनात बाळगतो ती मात्र त्या व्यक्तीसंबंधी असलेल्या आपल्या अपेक्षांशी मिळती जुळती असलेली प्रतिमा असते. साहजिकच, अतींद्रिय (Psi) अस्तित्व समाजाच्या आहे त्या स्थितीला जबरदस्त... धोकादायक ठरू शकते. कारण, ती शक्ती कार्य करू लागली तर व्यक्तीव्यक्तींमधील व्यवहारामध्ये संघर्ष निर्माण होण्याचा संभव असतो. अतींद्रिय शक्तीबाबतच्या भीतीचे हे मूळ असावे.''

**डॉ. टार्ट पुढे म्हणतात:**

''या भीतीच्या मुळाशी अधिक खोलवरचा एक संघर्ष असावा. त्याचे स्वरूप ध्यानात येण्यासाठी, व्यक्तीचे सामाजिकीभवन कसे होते ते लक्षात घेणे आवश्यक आहे. आपल्या ठायी जन्मतः बीजरूपक्षमता (potentialities) असतात. परंतु ज्या संस्कृतीत आपण वाढविले जातो तिच्यामुळे त्या सर्वांचा विकास होत नाही. प्रत्येक संस्कृतीत काही थोड्याच सुप्त क्षमतांचा विकास केला गेला आहे; काही अज्ञात राहिल्या आहेत, तर काही क्षमता इष्ट नसतात या समजुतीपायी त्यांचे दमन केले गेले आहे. सामाजिकीभवनाची प्रक्रिया बाल्यावस्थेपासूनच सुरू होते. बालकाचे सांस्कृतिक संगोपन करणाऱ्या मातापित्यांना वाटत असते की आपले मूल इतर मुलांसारखेच 'सामान्य' (Normal) असावे. त्यामुळे मुलांच्या ठायी असलेल्या काही सुप्त क्षमतांना वाव न ठेवणारा असा घाट त्यांच्या विकासास दिला जात असतो. मुलांस 'नीट' वळण लावण्यासाठी म्हणून माता स्वतःच्या खऱ्या भावभावना व्यक्त करीत नाही. कारण, स्त्रियांच्या मनावर असे बिंबवलेले

गेले असते की माता नेहमी प्रेमळ असली पाहिजे. कोणाही मातेस 'कुमाता' होणे नको असते. आता, माता व मूल यांच्यात मानससंक्रमणात्मक (telepathic) बंध असतो व त्यांच्यामधील संप्रेषण (Communication) बहुतांशी भावनांच्या द्वाराच होत असते. (या गोष्टीवर डॉ. कार्ल युंग यांनी खास भर दिला होता) जीवनदृष्ट्या हे भावनिक मानससंप्रेषण अत्यंत मोलाचे असते. स्वत:च्या मुलावर बिकट प्रसंग ओढवला आहे असे मातेस वाटावे व त्याच क्षणी ते संकटात असल्याचे वृत्त कळावे, हे त्याचे उदाहरण होय. आता, माता जर सामान्य मातांपेक्षा (Supernormal) श्रेष्ठ असल्याप्रमाणे वागत असेल तर मुलाच्या मनावर मानससंक्रमणाद्वारे काय परिणाम होईल ते पहा. समजा आईचा दिवस वाईट गेला आहे व तशातच मुलाकडून घरातील फुलदाणी फुटली आहे. 'सामान्य' मातेला वाटते की मुलास झोडपावे. परंतु स्वत:स 'सामान्य मातांपेक्षा श्रेष्ठ' समजणाऱ्या मातेला वाटते की मुलास सौम्य शब्दांत समजवून सांगावे, त्याच्यावर संतापू नये अशी समाजाची 'श्रेष्ठ' मातेबांबत अपेक्षा असते त्यामुळे ती मुलावरचा संताप न दर्शविता, 'माझे तुझ्यावर प्रेम आहे, तुझ्या कल्याणाची काळजी मी वाहते' या आशयाचे शब्द उच्चारते. तिच्या बोलण्यावर मुलाला विश्वास ठेवावा लागतो व आपण श्रेष्ठ प्रकारची माता असण्याची मातेची समजूतही दृढावते. तथापि, आई संतापली आहे व माझ्याविषयी तिच्या मनात तिरस्कारभाव निर्माण झाला आहे हे मुलास मानससंक्रमणामुळे आतल्या आत जाणवते. आईचे वरकरणी प्रेमळ बोलणे व मुलाला आतून जे जाणवते त्यांच्यामधील विसंगतीमुळे मुलाच्या अंतरंगात संघर्ष निर्माण होतो परंतु तो दाबून टाकला जातो. आई चांगली आहे अशी आईची प्रतिमा मूल स्वत:च्या मनात बाळगू लागते. 'तू रागावलेली आहेस' असे आपण म्हटले तर ती रागवेल ही भीतीही मुलास वाटत असते. हाच दमनसिद्धांत आपल्या बीजरूप अतींद्रिय क्षमतांना लागू आहे. त्यांना प्रतिबंध केला गेला व केवळ कल्पना (fantasy)म्हणून धुडकावून लावले गेले की सामान्यरीत्या आपल्याला मिळणारे संदेश आणि अतींद्रियरीत्या येणारा संदेश यांपैकी दुसरा धुडकावला व दोहोतील संघर्ष निकालात काढला जातो.

आता धरून चालू या की आपण प्रौढ माणसे समाजसंमतरीत्या वागत आहोत, आपण 'सामान्य'(Normal) आहोत, व आपल्या संस्कृतीने आपल्या नकळत आपल्या भावनांवर व वर्तनावर नियंत्रण ठेवलेले आहे, आता, खरोखरच आपण इतरांसारखेच सामान्य (Normal) आहोत काय अशी थोडीशी शंका येते, आपल्या काही भावना व विचार 'सामन्यत्वा' (Normaly)च्या मानदंडांशी जुळत नाहीत हे आपल्याला माहीत असते, परंतु त्या भावना व ते विचार आपण इतरांपासून लपवून ठेवतो. जेव्हा कोणी मानससंक्रमण, मनाचा भौतिक वस्तूवर प्रभाव, अनुमानाचा आधार नसतांना भावी घटनांचे ज्ञान, इत्यादींविषयी बोलू लागतो. तेव्हा आपण त्याच्याशी तर्कशुद्ध वाटेल अशा रीतीने बोलतो खरे, पण आपल्या अंतर्मनात मात्र वेगवेगळ्या प्रतिक्रिया होण्याचा संभव असतो. अंतरंगातील प्रतिक्रिया कोणत्या स्वरूपाची होईल हे पुढील गोष्टींवर अवलंबून असते: आपल्या व्यक्तित्वाची घडण कशा प्रकारे झालेली आहे, आपण स्वत:ला कितपत ओळखतो आहोत, अतींद्रियरीत्या येणाऱ्या अनुभवाची सत्यता, आणि स्वत:च्या अंतरंगातील संघर्ष संपुष्टात आणण्याची आपली स्वत:ची रीत. एक संभाव्य प्रतिक्रिया अशी की आपले अबोध मन म्हणते की मानससंक्रमाणादी अतींद्रिय क्षमता नसतातच. ही प्रतिक्रिया म्हणजे प्राथमिक नकार होय (Primary denial) दुसरी संभाव्य प्रतिक्रिया म्हणजे स्वत:च्या ठायी ज्या अतींद्रियक्षमता आहेत त्या असू नयेत व त्या असल्याचे इतरांना कळू नये असे वाटणे. आता स्वत:बाबतची आपली अशी रहस्ये असतात की खरे म्हणजे त्यांची लाज वाटण्याचे कारण नसते. परंतु ती इतरांना कळणे धोक्याचे आहे अशी भीती वाटत असते. वास्तविक इतरांचीही काही काही रहस्ये असतात परंतु ते ती गोष्ट कबूल करीत नाहीत. अतींद्रिय क्षमतांच्या संदर्भात बोलावयाचे तर असे म्हणता येईल की स्वत:च्या ठायी अतींद्रिय क्षमता आहे हे व्यक्तीच्या ध्यानी आलेले नसेल तर तिला आपल्या अशा अतींद्रियक्षमता असणे हे सोयीचे नव्हे असे वाटण्याची, अथवा, त्यांची भीती वाटण्याची शक्यता असते. पण ती भीती दाबून टाकली जाते, तिचे दमन होते, व मग अतींद्रियक्षमतांचे अस्तित्वच नाकारण्याची प्रवृत्ती निर्माण

होते. अथवा संघर्षापासून स्वत:ला बचावण्याचा (ego-defense)तो प्रयत्न असतो. स्व-बचावाचाच आणखी एक प्रकार असतो. तो म्हणजे अतींद्रियक्षमतांविषयी बोलणाऱ्या व्यक्तींना तसेच त्या क्षमतांचे प्रात्यक्षिक देणाऱ्या व्यक्तींना टाळणे. स्व-बचावाचाच आणखी एक मार्ग म्हणजे अतींद्रियक्षमतावाद्यांवर प्रतिहल्ला चढविणे. उदा. 'अतींद्रियक्षमतावादी मंडळी भलत्याच मार्गाला लागलेली खुळी माणसे आहेत' असे म्हणणे, 'लोकांना भुलविणारे लुच्चे' असे म्हणणे. प्रतिहल्ल्याचे आणखी एक रूप म्हणजे, अतींद्रिय क्षमतांचे अस्तित्व मान्य करावयाचे पण त्या अनिष्ट (evil) असतात असे प्रतिपादन करणे, त्यांच्यापासून स्वत: दूर राहणे व इतरांनाही दूर ठेवण्याचा प्रयत्न करणे. काही विरोधकांना असे वाटते की अतींद्रिय क्षमतांचे अस्तित्व मान्य केल्यास आपल्या 'स्व-पणास' धक्का पोहचेल. काही लोकांना, एरव्हीच्या म्हणजे ऐंद्रियसंवेदनाच्या, एरव्हीच्या भावनांच्या तसेच प्रेरणांच्या सीमांपलिकडे जाण्याचे व एका प्रकारच्या पोकळीत उडी घेण्याचे भय वाटते. त्यांना असेही वाटते की अतींद्रिय स्वरूपाची शक्ती असते असे मानले तर एक 'मी' व दुसरा 'मी' यांमध्ये भेद उरणार नाही;' मी 'ची व्याख्याच नव्याने करावी लागेल. स्वत:चा 'मी' व दुसऱ्या व्यक्तीचा 'मी' यांमध्ये भेद नसणे ही गोष्ट त्यांना रुचत नाही. आपल्या बऱ्याचशा कल्पना तसेच आपल्या बऱ्याच कृती अतींद्रियसंवेदन न होण्यावरच अर्थात इंद्रियसंवेदनावर अवलंबून असतात ह्या अमेरिकन संस्कृतीतील रूढ समजुतीशी अतींद्रियसंवेदन ही कल्पना विसंगत आहे असे आपणा अमेरिकनांना वाटते. आपण आपले काही पैलू इतके महत्त्वाचे मानतो की 'ते पैलू (aspects) म्हणजे मी' असे आपल्याला वाटते, व या (मर्यादित) 'मी' ला आपण आपल्या ऊर्जेवर आणि भावनांवर हुकूमत गाजवू देत असतो.

कोणत्या गोष्टी उचित समजाव्यात (व कोणत्या अनुचित गणाव्यात) हे संस्कृती शिकविते, आपण ती शिकवण स्वीकारतो व तेणेकरून इतरांशी संबंध राखू शकतो व सांभाळू शकतो आणि समाजाच्या पसंतीलाही उतरतो. व्यक्तीच्या 'मी' ची सीमा कोठपर्यंत असते व इतर व्यक्तींचे आपपले 'मी' कोठे सुरू होतात याविषयी संस्कृतिविशिष्ट अशा ज्या समजुती (Cultural beliefs) असतात. त्यांना परामानसिक स्वरूपाचे अनुभव जबरदस्त आह्वान देतात. आपल्या (अमेरिकन) संस्कृतीतच व्यक्तीचे सुख, तिची सुरक्षितता व तिचा इतरांबरोबर सहवास या गोष्टी ती सामान्य (Normal) असण्यावर अवलंबून ठेवल्या गेल्या आहेत. अतींद्रियसंवेदन(ESP) हा प्रकार भीतिदायक वाटतो''.

वरीलप्रमाणे, अतींद्रियशक्तीविषयी वाटणाऱ्या भीतीची कारणमीमांसा केल्यानंतर, डॉ. टार्ट विचारतात:

''जर तुमच्या परामानसिक क्षमता एकदम वाढल्या, तर तुम्हाला इतरांच्या मनातले कळू शकेल, तुम्ही घटना प्रभावित करू शकाल, इतरांच्या विचारांवर प्रभाव गाजवू शकाल, गूढ ज्ञान प्राप्त करून घेऊ शकाल. जर असे झाले तर तुम्ही कसे वागाल? स्वत:विषयीची तुमची कल्पना काय होईल? आपल्या (अमेरिकन) संस्कृतीत तर असे काहीच नाही की जे मार्गदर्शन करू शकेल. आपल्या (अमेरिकन) संस्कृतीची शिकवण तर नकारात्मक आहे. ती म्हणजे: तुम्ही अशा गोष्टी करूच शकणार नाही; अतींद्रियशक्ती मानून तुम्ही स्वत:ला भ्रमात टाकता आहात; तुम्हाला खूळ लागले आहे; अशा गोष्टी, असे प्रकार दुष्ट शक्तींकडून केले जात असतात, त्यामुळे अशा नवनव्या क्षमता तुम्हाला प्राप्त होऊ लागल्या तर तुम्हास बेचैन (bad)वाटू लागेल, इतरांपासून एकाकी पडल्यासारखे व त्यांचा आधार व त्यांची सहानभूती गमावल्यासारखे वाटेल, व तुम्ही वेडे होण्याच्या मार्गाला लागाल.''

वरील शक्यता लक्षात घेऊन डॉ. टार्ट म्हणतात ''मला असे वाटते की परासामान्य अथवा परामानसिक क्षमतांचा विकास हळूहळू व्हावयास हवा. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत हळूहळू व्यक्तीच्या ठायी परिपक्वता येत गेली की तो विकास व्हावयास हवा''.

• • •

# दखल घ्यावी असा, असाही एक विषय

प्रा. मोहन पाठक

मानवी अस्तित्वाची मूलभूत गरज म्हणजे वस्ती करून राहणे ही आहे. कोणत्याही वस्तीची किंवा वसाहतीची जी अनेक व्यवच्छेदक लक्षणे म्हणून सांगता येतील त्यांतील एक म्हणजे सातत्याने निर्माण होत राहणारा कचरा हे होय! कचरा हा इतका उपेक्षित विषय आहे की या विषयाची जशी दखल घ्यायला हवी तशी दखल कोणत्याही स्तरावर घेतली जात नाही. परिणामत: कचऱ्याचे व्यवस्थापन, कचरा निर्माण होणार नाहीत अशा शक्यतांचा विचारच केला जात नाही. परंतु use and throw या पाश्चात्य विचारसरणीचा आधुनिक जीवनावर जो प्रभाव आहे त्यानुसार कचरा करण्याच्या क्षमता प्रचंड वाढलेल्या आहेत. या सर्वांतून वाढत्या शहरीकरणाच्या वेगामुळे निर्माण होणारी शहरेही झपाट्याने कचराग्रस्त होत आहेत. मोठमोठ्या इमारती बांधल्या जातात, सोसायट्या तयार होतात आणि वस्ती वाढली की कचऱ्याचा प्रश्न उग्र रूप घेऊन कोपऱ्याकोपऱ्यावर आपले अस्तित्व जाणवून देण्यास प्रारंभ करतो. या कचऱ्यात शिळे अन्न, भाजीपाला, काचासमान, लोखंडी, कातडी सामानापासून सर्व काही असते. विशेषत: सरत्या शतकाला शाप ठरतोय प्लॅस्टिक व पॉलिथिन बॅग्जचा. वारा आला की सर्वदूर उडून जाणाऱ्या व कशानेही नष्ट न होऊ शकणाऱ्या बॅग्जचे, ज्यांना कॅरी बॅग किंवा प्लॅस्टिकच्या पिशव्या म्हणतात, ढीगच्या ढीग असतात. या , इंग्रजीत ज्यांना non biodegradable material असे म्हटले जाते, बॅग्जनी अनेक समुद्रांचे तळ व्यापायला सुरुवात केल्याने मत्स्योद्योगावर विपरीत परिणाम होण्यास सुरुवात झाली आहे.

मुंबईच्या उपनगरीय रेल्वेने प्रवास करणे म्हणजे जिवंतपणी नरकयातना भोगणे असते. या प्रवासात रुळाच्या दोन्ही बाजूंना या पिशव्या आपले रंगबेरंगी अस्तित्व दाखवून मानवी कचऱ्याचा प्रश्न व त्याचे गांभीर्य अधोरेखित करीत असतात.

एकूणच जगाच्या दृष्टीने गंभीर होत जाणारी ही समस्या उग्र रूप धारण करत आहे असे पाहिल्यावर पर्यावरणाचा विचार करणाऱ्यांची झोप उडाली आहे. आणि जागतिक स्तरावर, राष्ट्रीय स्तरावर विचारवंत या विषयाच्या अभ्यासाकडे वळले आहेत. अनके परिसंवाद, चर्चासत्रे, कार्यशाळा घेऊन या विषयाचे अवगाहन केले जात आहे. हे चांगले चिह्न आहेच. पण याबरोबरच व्यक्तीव्यक्तीच्या पातळीवर, आपण कचरा कसा निर्माण करू शकणार नाही याचा विचार व कृती होणे आवश्यक आहे. 'मला काय त्याचे' ही वृत्ती सोडली नाही तर येणारे शतक कचऱ्याचा भस्मासुर घेऊन उगवेल व हा भस्मासुर मानवी अस्तित्वासमोर धोका निर्माण करील . अस्तित्वाला आह्वान ठरेल. या दृष्टीने प्रत्येकाने आपली कचरा करण्याची क्षमता व शक्यता अभ्यासली पाहिजे.

या संदर्भात एका प्रख्यात औषधकंपनीशी झालेला माझा पत्रव्यवहार व त्या संदर्भातील त्या कंपनीच्या उत्तराचे उदाहरण मला येथे द्यावेसे वाटते. या औषधकंपनीला मी अशी विनंती केली होती की विशिष्ट टॉनिकच्या बाटल्या, त्या बाटल्या ठेवण्यासाठी वापरली जाणारी खोकी वापर झाल्यावर रुग्ण कचऱ्यात फेकून देत असतात. त्याऐवजी पूर्वी दुधाच्या किंवा आता शीतपेयांच्या बाटल्या परत केल्यावर जशी अनामत रक्कम देऊन त्या बाटल्या निर्जंतुक करून परत वापरण्याच्या प्रथात आहे त्याच धर्तीवर आपण व अन्य औषध कंपन्यांनी अशीच योजना राबवली तर कचरा कमी करण्यास मदत होईल. या माझ्या विनंतीवर संबंधित कंपनीच्या अधिकाऱ्यांनी खेद व्यक्त करून, असे करता येणे शक्य नसल्याचे कळवले होते. कारण काही दिलेले नव्हते. माझ्या एका मित्राच्या तर्कानुसार त्या बाटल्या तयार करणाऱ्या कामगारांवर बेकारीची पाळी येईल, म्हणून असे असेल. तर मग शीतपेयांच्या बाबतीत किंवा अन्य अशा पद्धतीत बेकारीची शक्यता नसते काय?

एका औषध कंपनीतील अधिकारी मित्राने quality control चा मुद्दा सांगितला पण तोही मला तर्कसुसंगत वाटला नाही. reuse जेथे करू नये अशा ठिकाणी गैर पद्धतींनी reuse केला जात असल्याची अनेक उदाहरणे आपल्याकडे पहायला मिळतात. अगदी ढोबळ उदाहरण इंजेक्शनच्या डिस्पोझेबल सिरींजचे आहे.त्याच सिरींज परत पॅक करून विकल्या जातात असा एका सर्वेक्षणाचा अहवाल एका इंग्रजी वृत्तपत्रात होता. किंवा मिनरल वॉटर या नावाखाली होणारे गैरप्रकार आपल्याला चालतात, मग योग्य ठिकाणी आपण हे reuse चे तंत्र का अवलंबत नाही, याला कोणतेही उत्तर नाही. अनेक औषध कंपन्यांनी हे reuse चे तंत्र अमलात आणले तर होणारा कचरा कितीतरी प्रमाणात आटोक्यात येण्यासारखा आहे. तसेच उत्पादनावरील अनावश्यक खर्चही वाचू शकणारा आहे. पण मांजराच्या गळ्यात अशा विचारांच्या अवलंबाची घंटा बांधायची कोणी, हा खरा प्रश्न आहे.

रंगीबेरंगी प्लास्टिकच्या पिशव्यांचाही हाच प्रकार आहे. जाहिरात छापून लहान मोठे दुकानदार, अगदी किराणामालापासून ते सोनारापर्यंतचे सर्व उद्योग जणू काही एक मताने हा कचरा बाजारात लोटत असतात. या प्लॅस्टिक बॅग्ज वापरण्यापेक्षा प्रत्येकाने कापडाच्या पिशव्या वापरण्याचा निश्चय केला तर कचरा निर्माण होण्याची केवढी तरी मोठी शक्यता कमी होईल. पूर्वी कापडी पिशव्यांचाच वापर होता किंबहुना आजही तो शक्य आहे व कापड विघटनक्षम असल्याने त्याची अडगळ होणे शक्य नाही. कापडाचा जास्तीत जास्त वापर करण्याची दृष्टी पूर्वी होती त्यामुळे चादर फाटली की त्यापासून पिशव्या, उशीच्या खोळी, पडदे बनविले जात. माझ्या परिचयातील एक गृहस्थ अजूनही लेंग्यापासून बनविलेल्या पिशव्या वापरणे पसंत करतात. बाहेर पडताना अशा पिशवीची बारीक घडी ते खिशात बाळगतात व कोणी प्लॅस्टिकची बॅग दिली तर ती नाकारून ते आपल्याच पिशवीचा वापर करतात.

पर्यावरण म्हणजे काहीतरी आपल्यापाशी संबंधित नसलेले विषयक्षेत्र आहे असे नाही तर आपल्या दैनंदिन जीवनापाशी अतिशय संबंधित असे क्षेत्र आहे. पर्यावरण स्वच्छ राहिले तरच आपले जीवन संभव आहे. या दृष्टीने जनमानसात जागृती निर्माण झाली पाहिजे. श्री दिलीप कुलकर्णींचे 'दैनंदिन पर्यावरण' राजहंस प्रकाशन, पुणे, हे छोटेखानी पुस्तक प्रत्येकाने वाचावे असे आहे. ग्रंथपाल म्हणून या पुस्तकाचा व अशा साहित्याचा मी वारंवार प्रचार करीत असतो.

हा कचऱ्याचा प्रश्न आपल्या परीने कमी करता येण्याचे आणखी एक क्षेत्र म्हणजे स्वयंपाकघर. शिळे अन्न फेकून देऊन कचरा वाढवण्याची सवय अनेक मोठ्या उच्चभ्रू घरांत असते. फ्रीजचा 'अयोग्य वापर' करूनही अन्न जेव्हा उरते तेव्हा ते कचऱ्यात टाकून देणे यात आपण काही गैर करीत आहोत असेही त्यांना वाटत नाही. 'अन्न हे पूर्ण ब्रह्म' म्हणणाऱ्या आमच्या संस्कृतीत असा अन्नाचा गैरवापर हा खरे तर दंडनीय अपराध मानायला हवा. मराठीत एक म्हण आहे 'खाऊन माजावे पण टाकून माजू नये' आपल्या गरजेपुरते अन्न शिजवणे, त्याचा योग्य व परिपूर्ण वापर करणे ही तर काळाची केवढी तरी मोठी गरज आहे. लग्न समारंभात कॉंट्रॅक्ट पद्धतीने घातल्या जाणाऱ्या जेवणावळी व त्यांत होणारा अन्नाचा गैरवापर पाहिला की पर्यावरणाची चिंता अधिकच तीव्र होते.

शाकाहारी आहार घेणाऱ्यांच्या कचऱ्यात भाज्यांचे अवशेष (शेंगांची टरफले, पालेभाजांचे देठ वगैरे) हा एक मोठा कचऱ्याचा भाग असतो. हा कचरा प्रत्येक घरात वेगळ्या कचरापेटीत जमवून महानगरपालिकांनी नियोजन केल्यास गुरांचे उत्कृष्ट खाद्य उपलब्ध होऊ शकते. साहजिकच दुग्धोत्पादन व्यवसायाला हा कचरा उपयोगी ठरू शकतो.

शासन, नगरपालिका यांच्यावर सर्व जबाबदारी टाकण्यापेक्षा काही सहकारी संस्थांनी कचरानियोजन कार्यक्रम हाती घेऊन ते काम करणे ही मोठी गरज आहे. अनियोजित स्वरूपातील या कचऱ्याची विल्हेवाट हा मोठा प्रश्न तर आहेच, पण त्याहीपेक्षा नियोजन व विल्हेवाट नीट न झाल्याने होणारे पर्यावरणाचे नुकसान अतिशय गंभीर झाले आहे. स्वच्छ पर्यावरण नसणे यातून निर्माण होणाऱ्या समस्या अतिशय गहन आहेत, तो स्वतंत्र ग्रंथाचाच विषय आहे त्यामुळे तूर्त, असेही प्रश्न असतात व आपण दखल घेणे गरजेचे असते इतकेच!

• • •

# परिसर वार्ता

**प्रा. मोहन पाठक**

डिसेंबरचे दिवस ! प्रत्येक विद्यार्थ्याच्या दृष्टीने मंतरलेले, आठवणीचे प्रदेश बहरून टाकणारे, हवेहवेसे दिवस. स्नेहसंमेलने, स्पर्धा, पारितोषिके यांचे दिवस.

आमच्या महाविद्यालयाच्या परिसरात कला वाणिज्य महाविद्यालयाचा नवरंग उत्सव हा खरोखरच नवरंगी उत्सव असतो. विविध रंगांच्या कपड्यांत फिरणारे युवायुवती, रोझ डे, ट्रॅडिशनल डे, साडी व टाय डे अशा उपक्रमांत हरवून जाणारे युवायुवती म्हणजे या परिसराचा श्वासच जणू. १६ डिसेंबरपासून नवरंग ला सुरुवात झाली. प्राचार्य सदाशिव गोखले यांनी दीपप्रज्वलन केले. नटराज व सरस्वती यांचे पूजन केले आणि नऊ रंगांची फीत कापून उत्सवाचे औपचारिक उद्घाटन केले. नऊ रंगांचे कपडे घातलेल्या विद्यार्थिनींनी नऊ प्रकारची फुले वाहून सरस्वती व नटराज पूजन केले.

**स्पर्धांचा उत्सव**



नवरंग नृत्य स्पर्धेचा आनंद लुटताना प्राचार्य गोखले व सहकारी प्राध्यापक विद्यार्थ्यांसमवेत

नवरंगमध्ये प्रथम व्यक्तिमत्व स्पर्धा झाल्या १९९७-९८ चा नवरंगकिंग हा किताब मिळविणाऱ्या गणेश खराडेला या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला तर नवरंग क्वीन हा किताब मिळवणाऱ्या आरती बाकलेला स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळाला

या नवरंगाच्या अंतर्गत झालेल्या विविध स्पर्धा व त्यांचे निकाल खालीलप्रमाणे -

| | |
|---|---|
| व्यक्तिमत्व स्पर्धा | १) गणेश खराडे (प्रथम क्रमांक) |
| | २) आरती बाकले (द्वितीय क्रमांक) |
| | ३) कमलजीत कांबळे (नवरंग प्रिन्स) |
| | ४) उर्मिला काडुलकर (नवरंग प्रिन्सेस) |
| रांगोळी स्पर्धा | १) चेतना देसाई (प्रथम) |
| | २) दीपाली ठाकूर (द्वितीय विभागून) |
| | ३) हर्षाली कोळी (द्वितीय विभागून) |
| | ४) मीनल लोणकर (उत्तेजनार्थ) |
| | ५) गीता सावरकर (उत्तेजनार्थ) |
| पुष्परचना स्पर्धा | १) चैत्राली गोखले (प्रथम क्रमांक) |
| | २) केतकी कुलकर्णी (द्वितीय क्रमांक) |
| | ३) भावना पराडकर (तृतीय क्रमांक) |
| अभिनय स्पर्धा | १) प्राची जोशी (प्रथम क्रमांक) |
| | २) साक्षी बर्वे (द्वितीय क्रमांक) |
| | ३) चेतना चवाथे (तृतीय क्रमांक) |
| क्वीझ | १) माया नायर |
| | २) दीपाली भिडे |
| | ३) प्रसनजीत येसांबारे |
| | १) वासुदेव देशपांडे |

| | |
|---|---|
| | २) भक्ती राऊत |
| | ३) रेशमा सुकधनकर |
| चित्रस्पर्धा | १) नीरज कुमार (प्रथम क्रमांक) |
| | २) विभा भोसले (द्वितीय क्रमांक) |
| | ३) भावना पराडकर (विभागून) |
| | ४) संदीप तुटे (विभागून) |
| नाट्याविष्कार | १) गणेश खराडे व मित्र |
| | २) वसंत जगदाळे व मित्र |
| वेशभूषा | १) संतोष ढमाले व समूह (सामूहिक गट) |
| | २) निशा कदम (प्रथम क्रमांक) (वैयक्तिक गट) |
| | ३) संदीप मोघे (उत्तेजनार्थ) |
| पारंपरिक | १) संतोष ढमाले व समूह (सामूहिक गट) |
| वेश | १) केतकी कुलकर्णी (प्रथम क्रमांक) (वैयक्तिक गट) |
| | २) वसंत जगदाळे (द्वितीय क्रमांक) |
| मेंदीभरण | १) पुष्पा फरिया (प्रथम क्रमांक) |
| | २) प्रणाली विचारे (द्वितीय क्रमांक) |
| | ३) शिरीन कुरेशी (तृतीय क्रमांक विभागून) |
| | ४) मोतीबानू अब्दुल (तृतीय क्रमांक विभागून) |
| | ५) श्रद्धा मोहिले (उत्तेजनार्थ) |
| वादविवाद स्पर्धा | १) गणेश खराडे (प्रथम क्रमांक) |
| | २) रवींद्र मांजरेकर (द्वितीय क्रमांक) |
| | ३) वर्षा थोरात (तृतीय क्रमांक) |
| गायन वैयक्तिक | १) मीनल लोणकर (प्रथम क्रमांक) |
| | २) निवेदिता जोशी (द्वितीय क्रमांक) |
| | ३) अनिरुद्ध भानुशाली (तृतीय क्र.) |
| गायन द्वंद्व | १) विशाल बोकेफोडे व पल्लवी कासार (प्रथम क्रमांक) |
| | २) राजश्री दांडेकर व वनिता कांबळे (द्वितीय क्रमांक) |
| नृत्य-वैयक्तिक | १) रूपाली पाटील (प्रथम क्रमांक विभागून) |
| | २) अमिता गोखले (प्रथम क्रमांक विभागून) |
| | ३) स्नेहा बाजपेयी (तृतीय क्रमांक) |
| नृत्य-द्वंद्व | १) मानसी भोर व सारिका गोखले |
| नृत्य-समूह | १) शीतल मोरे व समूह |
| | २) स्नेहा बाजपेयी व समूह |
| खाद्य महोत्सव | १) यश फूड स्टॉल वसंत जगदाळे व इतर |
| | २) चायना टाऊन फूड स्टॉल संदेश निकम व इतर |
| | ३) रुचिरा फूड स्टॉल सीमा माने व इतर |
| अंताक्षरी | १) तृतीय वर्ष कला-संगीता साळकर विनायक शिंदे |
| | १) द्वितीय वर्ष कला-विशाल बोकेफोडे भटजी एस्. आर. |

नवरंगमधील स्पर्धांच्या या उत्सवात सहभागी असणाऱ्या सर्वांचेच अभिनंदन ! नवरंग प्रमुख, प्राध्यापक डॉ. अशोक घोपेश्वरकर व त्यांचे सहकारी प्राध्यापक यांना प्राचार्य गोखले सरांचे मार्गदर्शन लाभले होते.

## गणेश खराडे-यशस्वी घोडदौड

नवरंग किंग ठरलेल्या गणेशने वर्षभर आपले नाव आघाडीवर ठेवले आहे. चर्चगेटच्या सिडनहॅम मराठी साहित्य मंडळाने २२ डिसेंबर रोजी आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक गणेशला मिळाले. तर ठाण्यातील मावळी मंडळ संस्थेने आयोजित केलेल्या व्यायाम स्पर्धेत 'जोर व बैठका' गटात गणेशला अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. गणेशने दोन मिनिटांत ८० जोर व ११९ बैठका मारल्या. शरीरसौष्ठव स्पर्धेच्या तिसऱ्या गटात त्याला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

ठाण्याच्या मो. ह. विद्यालयाचा गणेश माजी विद्यार्थी. २ डिसेंबरला शाळेने त्याच्या कलागुणांचा गौरव करून त्याच्या कथाकथनाचा कार्यक्रम आयोजित केला होता.

## जोशी बेडेकर मध्ये मेधा पाटकर

नर्मदा आंदोलनाच्या नेत्या श्रीमती मेधा पाटकर. त्यांच्या विद्यार्थ्यांशी हितगुजाचा कार्यक्रम दहा डिसेंबर रोजी झाला. ''समाजऋणातून मुक्त होण्यासाठी आपण सतत सामजिक कार्य केले पाहिजे. जेथे जेथे अन्याय, अत्याचार दिसेल तेथे तेथे पेटून उठले पाहिजे'' असा मोलाचा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. शिवाय नर्मदा बचाव व एनरॉन विरोधी आंदोलनांविषयी माहिती दिली. हा कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत झाला.

बारा डिसेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत टाटा हॉस्पिटलच्या सहकार्याने रक्तदानशिबिर आयोजित केले गेले.

## रोझ डे

कला वाणिज्य महाविद्यालयात नवरंगच्या उद्घाटनाच्या दिवशीच रोझ डे साजरा करण्यात आला. यात महेश निसार किंग ठरला. तर झेलम सोनार रोझ क्वीन ठरली. कनिष्ठ महाविद्यालयातून रोझ प्रिन्स म्हणून मंदार सावंतची निवड झाली. रोझ प्रिन्सेस म्हणून आरवी नगरवालाची निवड झाली.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

आमच्या महाविद्यालयात इंद्रधनु ९७ या नावाने झालेल्या वार्षिक उत्सवाला प्राचार्य सी. जी. पाटील, उपप्राचार्य डॉ. सी. म. सारंग व प्रा. मकरंद दीक्षित यांचे मार्गदर्शन लाभले होते. रसायनशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक व कलामंडळप्रमुख प्रा. विनायक बुटकुले यांनी व त्यांच्या सहकारी प्राध्यापकांनी उत्सवाचे अतिशय शिस्तबद्ध आयोजन केले होते.

दि. २१ रोजी आमच्या विद्या प्रसारक मंडळ या मातृसंस्थेचे उपाध्यक्ष कविवर्य पी. सावळाराम यांचे दु:खद निधन झाले . त्यामुळे दि. २२ रोजी सुगम संगीतापासूनच्या स्पर्धांची सुरुवात प्राचार्य पाटील यांनी पी. सावळाराम यांच्या श्रद्धांजलीचा ठराव वाचून व दोन मिनिटे स्तब्धता पाळून करण्यात आली.

या वार्षिक महोत्सवानिमित्ताने विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव देणारे एक वेगळे प्रदर्शन भरविण्यात आले होते. यात अपर्णा बाफलेकर, वरद प्रधान, जितेंद्र कदम आदी अनेक विद्यार्थ्यांच्या कलाकृती ठेवण्यात आल्या होत्या. तसेच तृतीय वर्ष वनस्पतिशास्त्र विद्यार्थ्यांच्या पुष्परचनांचेही प्रदर्शन भरविण्यात आले होते.



प्रदर्शनातील चित्रकृती पाहताना प्राचार्य पाटील सर व डॉ. सारंग

स्पर्धांचा व विजेत्यांचा तपशील पुढीलप्रमाणे,

सुगम संगीत-वैयक्तिक १) मधुरा मोडक-प्रथम क्रमांक

२) मीनल जोगळेकर-द्वितीय क्र.

३) सागर बद्री-उत्तेजनार्थ

सुगम संगीत-द्वंद्व १) यतीन ओक व पूनम मोरे

(या स्पर्धेसाठी सौ. एस. आर. नातू व महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी नेहा चांदना यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले)

अंताक्षरी (मराठी) १) एकनाथ होले व प्रज्ञा अभ्यंकर (प्रथम क्रमांक)

२)आर्ची कोल्हटकर व पल्लवी जोशी (द्वितीय क्रमांक)

प्रमुख प्राध्यापक-हेमंत नानिवडेकर

रांगोली १) अपर्णा बाफलेकर-प्रथम क्रमांक

२) सचिन तोरवे-द्वितीय क्रमांक

३) हर्षाली खोबरेकर-तृतीय क्रमांक

(परीक्षक-सौ. मटकर) प्रमुख प्राध्यापक-डॉ. सौ. महाजन

शुभेच्छा भेटकार्ड १) रश्मी नातू-उत्तेजनार्थ १

२) सीमा-उत्तेजनार्थ २

(परीक्षक-मंजिरी धांडेकर) प्रमुख प्राध्यापक-ए. के. जगताप

केशभूषा १) समीना आगा-प्रथम क्रमांक

(परीक्षक-सौ. डोंगरे) प्रमुख प्राध्यापक सौ. संध्या पावल

मेंदीभरण १) अपर्णा लोखंडे-प्रथम क्रमांक

२) आरती बेंडे-द्वितीय क्रमांक

३) स्मिता म्हादळकर-तृतीय क्रमांक

(परीक्षक-सौ. एस्. आर. नातू) प्रमुख प्राध्यापक डॉ. आर. पी. आठल्ये

व्यक्तिमत्त्व १) गिरीश बारजे-प्रथम क्रमांक

२) धनंजय सखदेव-द्वितीय क्रमांक

३) अभिजित पेठे-तृतीय क्रमांक

(परीक्षक-श्री. चिमोटे, प्रा. सौ. उषा तांबे, मंदार दीक्षित)

नृत्य वैयक्तिक १) सारिका मढवी-प्रथम क्रमांक

२) सारिका काणे-(द्वितीय क्रमांक)

नृत्य सामूहिक १) प्रणव खोडीफाड व इतर

(परीक्षक-सौ. सुनीता शैलजन व कु. नीलिमा कडे) प्रमुख प्राध्यापक-ए. के. जगताप



नृत्यमग्न नर्तिका

अंताक्षरी हिन्दी १) विजय माने व सारिका अवस्थी

२) ज्योती सुब्रमण्यन व कमल टेंबुलकर

प्रमुख प्राध्यापक-संजय जोशी

### क्रीडाक्षेत्रात आमचे विद्यार्थी

आमचे महाविद्यालय फक्त विज्ञान शाखेचे असल्याने व विद्यार्थ्यांचा बहुतेक वेळ प्रात्यक्षिके, व्याख्याने यांच्या चक्रात अडकलेला असल्याने या क्षेत्रात आमचे विद्यार्थी इच्छा असूनही भरीव कामगिरी करू शकत नाहीत. जिमखान्याचे प्रमुख प्रा. अशोक पाटील व त्यांचे सहकारी प्राध्यापक प्राचार्य पाटील सरांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने जे प्रयत्न करतात त्यांतून आमच्या महाविद्यालयातील सीमा बोराडे किंवा अमित भरम सारखे विद्यार्थी, राज्य, राष्ट्रीय पातळीपर्यंत यशस्वी ठरतात. आम्हाला अशा विद्यार्थ्यांचा अभिमान वाटतो. एफ्. वाय्. बी. एससी. मधील सीमाचे उल्लेखनीय यश पुढीलप्रमाणे-

१) नांदेड येथे मे ९७ मध्ये झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील कराटे चँपियनशिप स्पर्धेत सुवर्ण पदक. या स्पर्धा नांदेडच्या भारतीय विद्यार्थी सेनेने आयोजित केल्या होत्या.

२) ठाण्याच्या 'ड्रॅगन कराटे व मार्शल आर्ट' ने आयोजित केलेल्या कराटे चँपियनशिप स्पर्धेत सीमाला जून ९७ मध्ये रौप्यपदक मिळाले

३) डिसेंबर ९७ मध्ये देहू रोड येथे झालेल्या राज्यस्तरीय मार्शल आर्ट चँपियनशिप स्पर्धेत सीमाला ४६ ते ५० किलो वजन गटात सुवर्णपदक मिळाले.

४) अखिल भारतीय फुल काँटॅक्ट चँपियनशिप या स्पर्धा जानेवारीला ठाण्यात झाल्या यात सीमाला सुवर्णपदक मिळाले.

सदर वृत्तांत तयार करीत असताना जानेवारीच्या मध्यावर मुंबई विद्यापीठात होणाऱ्या स्पर्धांकडे आमचे लक्ष लागले आहे. आपल्या यशाची घोडदौड चालू ठेवणारी सीमा त्या स्पर्धेतही उज्ज्वल यश मिळवेल याचा विश्वास आहे. सीमाचे अभिनंदन व शुभेच्छा.

सीमाप्रमाणे टी. वाय. बी. एस्सी. मधील अमित भरमनेही अनेक स्पर्धांत विजयी सहभाग घेतला. मुंबई विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन जिम्नॅस्टिक्स स्पर्धेत अमितला कांस्य पदक मिळाले. अमृतसर व नाशिक येथील स्पर्धांमध्येही उज्ज्वल यश त्याने मिळविले.

नाशिकच्या योग विद्या धाम या संस्थेने घेतलेल्या योगासन स्पर्धेत आमच्या एफ. वाय. बी. एस्सी. मधील दिनेश कुराडेला प्रथम क्रमांक मिळाला. जानेवारीत नाशिकलाच होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत दिनेश भाग घेणार आहे. एफ. वाय. बी. एस्सी. मधीलच सॅलियन उत्तम संजु याला शरीरसौष्ठव स्पर्धेत (६५ ते ७० किलो) आंतरमहाविद्यालयीन स्तरावर मुंबई विद्यापीठाचे रौप्य पदक मिळाले.

### वार्षिक क्रीडा महोत्सव

प्रतिवर्षाप्रमाणे वार्षिक क्रीडा महोत्सव २० डिसेंबर रोजी परिसरातील मैदानावर संपन्न झाला. प्राचार्य सी. जी. पाटील यांनी महोत्सवाचे उद्घाटन केले. या महोत्सवात अनेक मैदानी क्रीडा प्रकारांत विद्यार्थ्यांनी व शिक्षकशिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेतला. याशिवाय कॅरम, टेबलटेनिस, बॅडमिंटन यांचे सामनेही जिमखाना समितीच्या वतीने आयोजित करण्यात आले होते.



क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन करताना प्राचार्य सी. जी. पाटील

या सर्व वार्षिकोत्सवास अनेकांचे सहकार्य लाभले होते. विशेषत: आमचा माजी विद्यार्थी केदार भट याने छायाचित्रणासाठी दिलेले सहकार्य अतिशय उल्लेखनीय आहे. कला मंडळाच्या वर्षभरातील घडामोडींसाठी विद्यार्थिप्रतिनिधी म्हणून कु. मीनाक्षी सोमण, मिलिंद भलगे, योगेश नाखवा, अपर्णा बाफलेकर, रिचा वाकणकर, नवीन किरण, सहिब, आकाश तिवारी, ज्योती सुब्रमण्यन, राम जोशी या सर्व विद्यार्थ्यांनी रस घेऊन जे काम केले त्याचा उल्लेख अनिवार्य आहे.

### तंत्रनिकेतन

आमच्या परिसरातील विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनामध्ये डिसेंबरअखेर ते तीन जानेवारीपर्यंत असेच उत्साहाचे वातावरण होते. वेगवेगळे खेळ, स्पर्धा, निबंधलेखन, काव्यलेखन स्पर्धा, व्यंगचित्ररेखाटन स्पर्धा, अंताक्षरी, अभिनयस्पर्धा याबरोबरच साडी डे, टाय डे हे आजच्या तरुणांच्या आकर्षणाचे खास दिन उत्साहात संपन्न झाले.

वर्षाचा शेवटचा दिवस विद्यार्थ्यांच्या मनात आपला ठसा उमटवून गेला तो प्रा. प्रवीण दवणे यांच्या 'दिलखुलास' गप्पांमुळे. हा कार्यक्रम खूपच रंगला. या सर्व उपक्रमांना

विद्यार्थ्यांचा लाभलेला प्रतिसाद अतिशय चांगला होता. आता विद्यार्थी ग्रंथालयाकडे वळताहेत, परीक्षांचे वेध लागायला सुरुवात झाली.

दरम्यान आमच्या तंत्रनिकेतनातील रसायन शाखेमधील पाच पदवीधारक विद्यार्थ्यांची सिंगापूर येथील 'इन्स्टिटयूट ऑफ टेक्निकल एज्युकेशन' तर्फे 'केमिकल स्पेशालिस्ट मॅनपॉवर प्रोग्राम' साठी निवड झाली. या पाच जणांची नावे अशी १) येवले उदय रमेश २) चिपळूणकर निरंजन चंद्रकांत ३) साळवी सचिन ३) बवाडिया हरेश रमेश ५) नागवेकर नीलेश अशोक

या सर्वांना शुभेच्छा देणारा अनौपचारिक कार्यक्रम डिसेंबरमध्ये झाला. त्यावेळी प्राचार्य सी. श्री. मुजुमदार, उपप्राचार्य नायक व इतर शिक्षक उपस्थित होते. अतिशय हृद्य असा हा कार्यक्रम. या विद्यार्थ्यांना 'दिशा' तर्फे हार्दिक शुभेच्छा!

### स्नेहसंमेलन-ए. के. जोशी मधील

सौ. आनंदीबाई केशव जोशी या विद्याप्रसारक मंडळाच्या इंग्रजी विभागाच्या माध्यमिक व प्राथमिक, पूर्व प्राथमिक विभागाचे स्नेहसंमेलन अनुक्रमे एक व दोन जानेवारी रोजी गडकरी रंगायतनमध्ये संपन्न झाले.

नववर्षारंभाच्या दिवशी म्हणजे दिनांक एक रोजी मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स मधील प्रा. डॉ. भट या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ. वा. ना. बेडेकर होते. दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. तसेच गेल्या वर्षभरातील घडामोडींचा आढावा घेणारा वार्षिक अहवाल सादर केला. शालांत परीक्षेचा १००% निकाल, संस्कृत शिष्यवृत्ती, होमी भाभा शिष्यवृत्ती इत्यादी यशांचा उल्लेख लक्ष वेधून घेणारा होता.

डॉ भट यांचे भाषण हे रूढ भाषणापेक्षा विद्यार्थ्यांशी साधलेला संवाद होता. विद्यार्थ्यांना आवडणारी कोडी घालीत व त्यांना बोलते करीत त्यांनी विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून घेतले. विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर यांनी विद्यार्थ्यांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. डॉ. भट यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

यानंतर झालेल्या विविधगुणदर्शनाच्या कार्यक्रमात मराठी, हिंदी, इंग्रजी भाषांतील नाच, गाणी, एकांकिका इत्यादींचा समावेश होता. या कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणून श्री. अरुण खाडिलकर, सौ. शैला सांगोली, सौ. सोमण यांनी काम पाहिले. त्यांनी पारितोषिक पात्र ठरविलेले कार्यक्रम पुढीलप्रमाणे

प्रथम क्रमांक-भारत की नारी (नृत्य)

द्वितीय क्रमांक-मर्कट पंजरी (मराठी एकांक)

तृतीय क्रमांक-खिडकी ना खोलो (हिंदी एकांक)

राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

### प्राथमिक/पूर्वप्राथमिक विभाग

२ जानेवारी रोजी गडकरी रंगायतनमध्ये झालेल्या प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागाच्या स्नेहसंमेलनास प्रमुख पाहुण्या म्हणून बाल शिक्षण विभागाच्या संचालिका श्रीमती विजया मूर्ती उपस्थित होत्या. या विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती बेलेंडा डिसूझा यांनी त्यांचा परिचय करून देऊन अहवाल सादर केला. पूर्व प्राथमिक विभागप्रमुख सौ. विशाखा देशपांडे यांनी या विभागाचा अहवाल सादर केला. मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर यांनी नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

प्रमुख पाहुण्या श्रीमती विजया मूर्ती यांनी, पालकांनी पाल्याशी कसे वागावे याबाबत बहुमोल मार्गदर्शन केले.

पूर्वप्राथमिक छोट्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या चार कार्यक्रमांत 'सॅटरडे नाइट' या नृत्यास प्रथम क्रमांक मिळाला. प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांच्या विविधगुणदर्शनाच्या कार्यक्रमात इयत्ता पहिलीतील व दुसरीतील 'कसम ना तोडेंगे' या नृत्यास प्रथम क्रमांकाचे तर तिसरी व चौथी मधील 'अरेबियन डान्स' या नृत्यास प्रथम क्रमांक मिळाला. पहिली ते चौथी या वर्गातील 'प्रेयर डान्स' या नृत्यास द्वितीय क्रमांक मिळाला.

परीक्षक म्हणून ज्योती टिपणीस व वासंती गोकाणी यांनी काम पाहिले.

•••

# बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषदेचे ठाण्यात झालेले अविस्मरणीय अधिवेशन

**प्रा. मोहन पाठक**

प्राच्यविद्या अभ्यास संस्था या संस्थेच्या पुढाकाराने ठाणे महाविद्यालयाच्या रम्य परिसरात बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्या परिषदेचे दुसरे अधिवेशन डिसेंबरच्या २६ ते २८ या तीन दिवसांत थोरले बाजीराव सभागृहात संपन्न झाले.

परिषदेची सुरुवात वेळेनुसार झाली, एवढेच नाही तर तीन दिवसांतील वेळेचे नियोजन आंतरराष्ट्रीय स्तरावरही वाखाणले जाईल इतके अचूक होते. सुरुवातीच्या उद्घाटन समारंभास मंत्रोच्चाराने प्रारंभ झाला. त्यानंतर प्रीती व प्रिया निमकर या भगिनींनी स्वागतगीत सादर केले. बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्याचे परिषदेचे सचिव श्री. श्रीकांत बहुलकर यांनी संदेशवाचन केले. या अधिवेनाच्या स्वागत समितीचे अध्यक्ष श्री. भगवानराव पटवर्धन यांनी स्वागतपर भाषण केले.

यानंतर सनईच्या पवित्र सुरांच्या पार्श्वभूमीवर प्रमुख पाहुणे श्री. एम. एन. देशपांडे व व्यासपीठावरील अन्य मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. श्री. देशपांडे यांनी पहिल्या अधिवेशनाचे इतिवृत्त व इतर दोन पुस्तकांचे विमोचन केले. आपल्या भाषणात बोलताना श्री. देशपांडे म्हणाले, ''भारताची परंपरा प्राचीन, पाच हजार वर्षे इतकी जुनी आहे व आजही ती टिकून आहे कारण या परंपरेला तत्वज्ञानाची बैठक आहे. इतर परंपरा काळाच्या ओघात नष्ट झाल्या. परंपरेचा हा वारसा टिकवला नाही तर आपण रसातळाला जाऊ.'' ''महाराष्ट्र ही ज्ञानाची भूमी आहे'' असे सांगून त्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज, श्री केतकर, विनोबा भावे अशा विद्वानांच्या संदर्भातील किस्से सांगितले. ते पुढे म्हणाले, ''या वारशाची जाणीव कमी होत चालली आहे. तरीही आशेचा किरण आहे. प्राच्यविद्येचा अभ्यास करण्याची प्रथा हा त्याचाच भाग आहे. हे जग म्हणजे उघडे पुस्तक आहे, ते वाचायला शिकले पाहिजे. पवित्र आयुष्य हे सौंदर्याच्या मैत्रीचा परिपाक आहे. महाराष्ट्रात ज्या ज्या संस्कृतींचा ओघ आला त्यांचा अभ्यास, आदिवासी संस्कृतींचा ओघ आला त्यांचा अभ्यास, आदिवासी संस्कृतीची दखल घेतली गेली पाहिजे'' प्राच्यविद्येच्या अभ्यासाची महती त्यांनी सोदाहरण विशद केली.

ठाण्याच्या प्राच्यविद्या संस्थेचे अध्यक्ष व या अधिवेशनाचे प्रमुख नियोजक डॉ. विजय बेडेकर यांनी आपले मनोगत थोडक्यात सांगितले.

बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्येचे अध्यक्ष डॉ. म. के ढवळीकर यांचे यावेळी झालेले भाषण पर्यावरणातील प्रश्नांचा सखोल व ऐतिहासिक विचार मांडून श्रोत्यांना अंतर्मुख करणारे होते. ते म्हणाले ''या विषयाबाबत लोकांच्या मनात रस निर्माण होत आहे हे चांगले चिह्न आहे. परिषद सुरू करण्यामागचा हेतू आपला इतिहास आहे तरी काय याचा विचार करून इतिहास शास्त्राच्या शाखेत येणाऱ्या नवीन प्रवाहांचा अभ्यास करणे हा आहे. लागणारे शोध उपयुक्त आहेत असे सांगून पर्यावरण प्रश्नाचे ऐतिहासिक दृष्टीने त्यांनी केलेले विवेचन अतिशय मोलाचे होते.

उद्घाटनाच्या सत्रानंतर पाच विभागांच्या संबंधित अध्यक्षांच्या भाषणांचे सत्र होते. यात 'वेद आणि अवेस्ता' यावर डॉ. बाळ गांगल यांचे व्याख्यान झाले. वेदातील सूक्ते, इतर शास्त्रे, ऋग्वेदीय पूजाविधी अशा विविध विषयांचा ऊहापोह त्यांनी केला. डॉ. मो. दि. पराडकर 'भारतीय धर्म आणि तत्त्वज्ञान ' या विषयावर बोलले. अर्थ आणि काम यांच्याकडे दुर्लक्ष करून ज्याप्रमाणे चालणार नाही त्याचप्रमाणे केवळ त्यांचाच विचार करून समाज व धर्माची प्रगती होणार नाही. हा त्यांनी मांडलेला विचार महत्त्वाचा होता. यानंतर डॉ. वा. केळेले (साहित्य

व भाषाशास्त्र) डॉ. अ. प्र. जामखडेकर (इतिहास आणि पुरातत्त्व) श्री. प्र. ल. वैद्य (विज्ञान आणि तंत्रज्ञान) या विभागीय अध्यक्षांची भाषणे म्हणजे अमूल्य असे विचारमंथन होते.

यानंतर अधिवेशनातील विभागसभांना सुरुवात झाली. शुक्रवार , शनिवार व रविवार मिळून शंभराच्या वर शोधनिबंध वरील पाच विषयांच्या संदर्भात सादर करण्यात आले. शनिवारी प्रा. मे. पुं. रेगे यांचे 'धर्मशास्त्राची परंपरा आणि नीतिशास्त्र' या विषयावर झालेले विशेष व्याख्यान ही अपूर्व पर्वणी होती. या विषयावरील मूलभूत चिंतनावर आधारित अशा त्यांच्या व्याख्यानाने अनेकांना प्रेरणा दिली. तसेच रविवारी डॉ. त्रिं. ना. धर्माधिकारी यांनी 'श्रौतवाङमय व वेदांचा अर्थ' या विषयासंदर्भात जे चिंतन आपल्या व्याख्यानातून केले तेही अतिशय बहुमोल असे होते.

### विशेष नोंदी

❊ या अधिवेशनासाठी प्राच्यविद्या अभ्यासक देशाच्या विविध ठिकाणांहून आले होते. पुण्याहून सुमारे चाळीस जण बस करून आले होते.

❊ प्राच्यविद्येचा अभ्यास म्हणजे बुजुर्ग मंडळींच्या विषय ही सर्वसामान्य कल्पना तरुण विद्यार्थ्यांच्या सहभागाने साफ पुसली गेली.

❊ पाच विभागांतील पाच सत्रे एकाच वेळी आमच्या महाविद्यालयांच्या विधि महाविद्यालयाच्या इमारतीत चालू होती. त्यातील कक्षांना दिलेली नावे लक्षणीय होती. टिळक कक्ष, काणे कक्ष, अभ्यंकर कक्ष व दीक्षित कक्ष या नावांतून प्राच्यविद्येच्या थोर अभ्यासकांच्या स्मृतीस यथायोग्य अभिवादन केले गेले होते. इतिहास व पुरातत्त्व विद्येची सत्रे मात्र थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झाली.

❊ अभ्यागत सदस्यांची सर्व व्यवस्था दृष्ट लागेल इतकी सुरेख होती विशेषत: कला महाविद्यालयातील निवास खोल्यांमध्ये फळांच्या करंड्या पाठविण्यात संयोजकांचे कौशल्य जाणवत होते.

❊ वेळेबरहुकूम झालेले हे अलिकडील काळातील एकमेव अधिवेशन असावे. स्वत: जातीने सर्व ठिकाणी लक्ष ठेवून असणारे डॉ. विजय बेडेकर यांचा वेळेचा कटाक्ष केवळ अद्वितीय होता.

❊ आमच्या विद्या प्रसारक मंडळाचे व प्राच्यविद्येचे पदाधिकारी श्री. उत्तम जोशी, मा. य. गोखले, श्री. वि. करंदीकर व प्राच्यविद्या संस्थेचे सर्व कार्यकर्ते अथकपणे या अधिवेशनातील अभ्यागतांची काळजी घेताना दिसत होते.

❊ या अधिवेशनानिमित्ताने महाराष्ट्र शासनाच्या अत्यंत उपयुक्त ग्रंथांचे प्रदर्शन विधि महाविद्यालयात भरविण्यात आले होते.

❊ डॉ. विजय बेडेकर यांच्या बरोबरीने त्यांचे चिरंजीव श्री. महेश व पत्नी सौ. सुमेधाताई यांनी जातीने सर्व ठिकाणी धावपळ करून केलेले कष्ट अद्वितीय होते.

❊ ठाणेवार्ताचे श्री. श्रीराम भिडे व त्यांचे सहकारी सर्वत्र धावपळ करताना दिसत होते.

❊ सर्व पाहुण्यांनी डॉ. विजय बेडेकरांच्या नियोजन-कौशल्याची केलेली स्तुती आम्हा ठाणेकरांच्या अंगावर मूठभर मांस वाढविणारी होती.

❊ बाहेरून येणाऱ्या पाहुण्यांच्या मनोरंजनार्थ दोन दिवस गाण्यांच्या कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

### समारोपाचा समारंभ

रविवारी दुपारी बरोबर चार वाजता प्रीती व प्रिया निमकर यांनी सादर केलेल्या प्रार्थनेने या समारोपास सुरुवात झाली. बृहन्महाराष्ट्र प्राच्यविद्यापरिषदेचे सचिव डॉ. श्रीकांत बहुलकर यांनी, संशोधनाला चालना देणे हा या अधिवेशनातील हेतू सफल झाला असल्याचे आपल्या समारोप प्रास्ताविकात नमूद केले. डॉ. म.के ढवळीकर यांनी अधिवेशनातील शिस्तीचा गौरव करून, 'आम्हाला शिस्तीचा अर्थ शिकण्याची संधी मिळाली' असे प्रशंसोद्गार काढले.

ठाणे प्राच्य विद्यासंस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर आपल्या भाषणात म्हणाले, ''विस्कळीतपणा व बेशिस्त यांना आपण सर्व क्षेत्रात तोंड देत आहोत तसे या अधिवेशनात होऊ नये याचा नागरिक म्हणून मी प्रयत्न केला. अर्थात मी एकटा नव्हतो तर त्या कामासाठी झटणाऱ्या असंख्य

कार्यकर्त्यांमुळे आम्ही सर्वांनी आपणांस हे करून दाखविले." प्रत्येक विभागात पारितोषिकप्राप्त ठरलेल्या निबंधांना पारितोषिके देण्यामागील भूमिका सांगताना ते म्हणाले, "सार्वजनिक संशोधनाची पातळी उंचावायाची असेल तर पारितोषिके आवश्यक ठरतात."

यानंतर समारोप समारंभाचे अध्यक्ष व प्रमुख वक्ते डॉ. धडफळे यांचे भाषण झाले. 'महाराष्ट्रीय संस्कृतीचे काही पैलू' या विषयावर बोलताना ते म्हणाले, "महाराष्ट्राचे परम वैशिष्ट्ये म्हणजे महाराष्ट्राचे कोश वाङ्मय हे आहे. महाराष्ट्रीय संस्कृतीचा विचार करताना शं. बा. जोशी, स. आ. जोगळेकर, आंबेडकर आदींचे संस्कृतीसंबंधातील विचार मुळातून लोकांनी वाचले आहेत का, हा मला प्रश्न पडतो." भाषेच्या संदर्भात अनेक सांस्कृतिक बाबींचा, कन्नड भाषेबरोबर तुलना करून त्यांनी तपशिलात परामर्श घेतला. नथ हा दागिना, जिलबी हा पदार्थ मुसलमानी संस्कृतीची देण आहे तर पुरणपोळी कर्नाटकातून, तूप तेलंगणातून आले अशी अनेक बाबींची मनोरंजक माहिती डॉ. धडफळे यांनी दिली.

### पारितोषिकवितरण

यानंतर झालेल्या पारितोषिकवितरणात पुढील संशोधनांस पारितोषिके जाहीर झाली. पण वयाने ज्येष्ठ असणाऱ्यांनी आपले वय आता पारितोषिके स्वीकारण्याचे नाही असे सांगून आदराने स्वीकारलेली पारितोषिके तेवढ्याच उदात्त भावनेने ठाणे शाखेला देणगी म्हणून परत दिली. पारितोषिक प्राप्त निबंध व त्यांचे संशोधक पुढीलप्रमाणे.

साहित्य व भाषाशास्त्र विभाग

प्रथम - डॉ. वा. के. लेले

(प्राचीन भारतीय वाङ्मयीन लोकशाही)

द्वितीय - डॉ. सौ. मंजुषा गोखले

(रघुदिग्विजय : इतिहास व राजनीतिशास्त्र यांचा मनोहर समन्वय

तृतीय - डॉ. सौ. कमल अभ्यंकर

(कालिदासाच्या साहित्यातील कर्णिकाराचा शोध)

उत्तेजनार्थ

१) डॉ. भाग्यलता पाटसकर

(अष्टाध्यायीतील स्त्रीलिंगी प्रत्ययांचे दोन गट)

२) कु. प्राची वसंत काणे

(भासाच्या नाटकातील वात्सल्य)

३) डॉ. मो. दि. पराडकर

(कुमारसंभव आणि तुलसीदास कृत पार्वती मंगल)

इतिहास व पुरातत्त्व विद्या विभाग

प्रथम - डॉ. सौ. शोभना गोखले

(सिरिसातकर्णी यांचे वृषोत्सर्जन नाणे)

द्वितीय - श्री. पद्माकर प्रभुणे

(आवटी अभ्यास: दुर्लक्षित नाणकशास्त्रीय पैलू)

तृतीय - डॉ. श्रीकांत बहुलकर

(अनवट संस्कृत वाङ्मयातील इस्लामचे पडसाद : काही नोंदी)

उत्तेजनार्थ

१) श्री. श्रीकांत प्रधान

( धेनुकाकट : एक पुनर्शोध)

२) श्री. वसंत ह बेडेकर

( कोलाईमध्ये राहणाऱ्या फिरंगी समाजाच्या सांस्कृतिक समस्या)

३) डॉ. वनमाला पार्थसारथी

(Garuda in Traditions from Tamilnadu - A study)

४) श्री. श. गो. धोपाटे व विश्वनाथ शेंड्ये

(रुक्मिणी स्वयंवर)

विज्ञान व तंत्रज्ञान विभाग

प्रथम - श्री. आगाशे

(योग आणि आयुर्वेद)

द्वितीय - डॉ. प्रमोद जोगळेकर

(प्राचीन व मध्ययुगीन प्राणिशास्त्रीय कल्पना)

तृतीय - श्रीपाद केशव चितळे

(विदर्भातील कृत्रिम शैल- स्थापत्य)

उत्तेजनार्थ

१) कु. शीतल गोगटे

(भूमिजा: पुरभूषणम्)

२) श्री. केशव कुंटे

(भारुथ येथील शिल्पांतून तत्कालीन संगीताचे दर्शन)

वेद आणि अवेस्ता विभाग

प्रथम - डॉ. सदाशिव डांगे

( ऋग्वेद आणि महिषबली)

द्वितीय - डॉ. प्र. वि. पाठक

(वैदिक आणि इण्डोइराणी साहित्यातील भूसांस्कृतिक अनुबंध)

तृतीय - डॉ. गणेश थिटे

(Vedisms in Daivratas Chandodarsana)

उत्तेजनार्थ

१) डॉ. गौरी माहुलीकर

(अथर्ववेदातील मणि संकल्पना: एक तौलनिक अभ्यास)

२) डॉ. मुकुन्दचंद्र ठाकर

(शुक्लयजुर्वेद समृद्धजीवनदर्शनम्)

३) परशुराम परांजपे - सफलक्षणम्

भारतीय धर्म व तत्त्वज्ञान विभाग

प्रथम - डॉ. उमा वैद्य

(योगवासिष्ठातील योग कल्पना)

द्वितीय - सौ. ज्योत्स्ना खरे

(अश्वत्थ = एक अनुचिंतन)

तृतीय - डॉ. कांचन मांडे

(अद्वैती आचार्य शंकरांची भक्तिस्तोत्रे: एक चिंतन)

उत्तेजनार्थ

१) डॉ. अलका बाकरे

(भारतीय धर्म आणि मृत्युदंड ही संकल्पना)

२) सौ. अनघा जोशी

('महापराध आणि दूष्य')

पारितोषकवितरणानंतर अधिवेशनासंबंधी प्रातिनिधिक मते मांडणारी डॉ. जामखेडकर, डॉ. कांचन मांडे व श्री. अ. ब. मराठे यांची भाषणे झाली. आभारप्रदर्शन श्री. मा. य. गोखले यांनी केले, तर पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

### आणखी काही नोंदी

- बाहेरून आलेल्या सर्वांनी आमच्या ठाणे महाविद्यालय परिसराचे तोंड भरून कौतुक केले.
- प्रत्येक कक्षात ओव्हरहेड प्रोजेक्टर, दूरध्वनी सेवा इ. सोयी उपलब्ध करून दिलेल्या होत्या.
- सत्रास सुरुवात झाल्यावर कक्षातून आत बाहेर करण्यास संपूर्ण मज्जाव होता. कक्षाचे दरवाजे बंद होत.
- उपाहारगृहाचे श्री. अनंतराव साटले, त्यांचे चिरंजीव श्री. प्रकाश साटले यांनी चहा व भोजन यांची ठेवलेली व्यवस्था अतिशय चोख होती.

• • •

# पर्यावरण

डिसेंबर ९७ दिशा अंकामधील अग्रलेखामध्ये 'क्योटो' परिषदेच्या निष्कर्षावर विज्ञानापेक्षा जिवनपद्धती आणि व्यापारी हीतसंबंधाचा पगडा असल्याचे लिहिले होते. या विषयावर अधिक प्रकाश टाकणारा लेख खाली देत आहोत.

इंटरनेटवरून हा लेख घेण्यात आला असून 'Friends of the Earth International' यांनी हा अहवाल तयार केला आहे.

## Lobbying for Lethargy - the Fossil Fuel Lobby and Climate Change Negotiations

In 1995 the Inter-Governmental Panel on Climate Change (IPCC) - the official scientific body assigned to investigate climate change and comprising over 2000 of the world's best climate and social scientists-delivered a stunning verdict on climate change that " the balance of evidence suggests a discernable human influence on global climate" This stark conclusion has stimulated a broad scientific and political consensus, that climate change is real and that it has to be tackled. And yet, despite this consensus, there are many players in the debate who make it their business to prevent international action at every opportunity - players who will marshal vast resources to frustrate the delicate negotiating process that could lead to binding targets on the emission of the gases that cause climate change.

Some of these players are nation states - especially those who export oil, coal and gas - and a few are simply political ideologues for whom any kind of international regulation is anathema. There is however another, often less visible, lobby which wields huge influence behind the scenes at the negotiations on climate change. This lobby has a clear, vested, financial interest in preventing any action whatsoever: the fossil fuel lobby.

### The Fossil Fuel Lobby

The fossil fuel lobby covers a wide range of mostly American industries which either extract, process and sell fossil fuels, generate electricity using coal, oil or gas or engage in commercial activities with high energy demands. Additionally, the automobile lobby often has a major role within this industrial sector. The companies are divided into three industry lobby groups which specialise in intervening in the climate change negotiations:

- The Global Climate Coalition (GCC)
- The International Climate Change Partnership (ICCP)
- The Climate Council

The memberships of the GCC and the ICCP are given in Annex 1 whilst the membership of the Climate Council ia a secret. In fact, the Climate Council is essentially a platform for Don Pearlman, who works for the Americal law firm Patton, Boggs, and Blow whose clients are known to include Du Pont, Exon, Texaco and Shell.

In addition to these industry umbrella groups there are lobbyists acting on behalf of industry trade association such as the Americal Petroleum Institute and the Edison Electric Institute. There are also individual company lobbyists as well as politically motivated organisations which have a broader economic agenda but put considerable effort into working on climate change. These include the US-based Citizens for a Sound Economy which plans to saturate Denver during the 1997 Group of 7 Economic Summit with 5,00,000 leaflets warning of the dire economic effect of action to combat climate change. It comes as no surprise to discover that Citizens for a Sound Economy contains few genuine Citizens but does enjoy massive financing by corporate interest including Amoco, BMW, Boeing, BP, Chevron, Dow, General Electric, General Motors, Honda, ICI, Mobil, Toyota, Unilever and Union Carbide.

Although these different industry groupings display a varied range of behaviours in public they essentially share a common policy goal. viz. the maintenance of a 'business-as-usual scenario' for as long as possible to allow their members to maximize profits-this means the unimpeded production and use of fossil fuels. Consequently, these bodies are spending literally millions of dollars challenging the science of climate change and disseminating propaganda concerning the allegedly disastrous economic impacts for the developed world (and specifically the United States) if international action is taken to reduce emissions of climate change gases.

### The Arguments

The fossial fuel lobby has been active behind

the scenes since 1989 and has focussed its efforts on four major arguments:

1. There is no real evidence that global temperatures have rises as result of human causes.
2. Computer models of climate change have predicate far more warning than satellite records actually show
3. Responding effectively to climate change is simply too expensive. It will cost US economy billions of dollars and hundreds of thousands of jobs.
4. There's no point in the industrial world doing anything to curb emission of heat-trapping gases, since developing countries like China and India will produce most of the heat-trapping gases in the future.

As the science has firmed up through the 1990s and better data sets have become available the first two arguments have effectively collapsed. They are only used for public posturing before poorly briefed audiences while being effectively abandoned within negotiations themselves. The scientific consensus around climate change is now essentially unshakable.

The abandonment of effective scientific dissent has forced the fossil fuel lobby to re-emphasise their econmic arguments and to point an accusatory finger at the developing world, especially those countries with the greatest industrial potential, India and China ( and this despite the fact that per capita emission of greenhouse gases in these countries is one twentieth of US per capita emissions)

These econmic arguments against combating climate change inevitably conjure up extreme visions of industrial collapse and widespread unemployment(600,00 job losses annually is the favoured figure of the Global Climate Coalition) but show little grasp of real world economics. As the Union of Concerned Scientists in the United States has pointed out, "This new myth is being rolled out by a business lobby group the GCC and its allies, now that their strategy of trying to discredit climate change science has failed... they switched from promoting junk science to pitching junk econmics."

"The economic models that generate these dire forecasts are deeply flawed. they assume that the only way reduce emissions is by the an enormous carbon tax. In reality, the United States and other countries are likely to use a range of fiscal, research, informational, incentive and regulatory policies to achieve cost-effective emission reductions.

"The models also grossly underestimate the capacity of America's economy to achieve the kind

of technical innovations that we've seen in the past in response to other major environmental prob

lems. Once national standards have been set-whether to reduce air pollution, to clean out our rivers and streams or to protect the stratospheric ozone layer-Americal business and industry have proven clever at implementing cost-effective solutions. These solutions have created hundreds of thousands of new jobs and improved may companies' competitiveness in global markets."

**Ignoring the alternatives**

It soon becomes clear, from even the most cursory analysis of the fossil fuel lobby's economic arguments, that they are all too willing to simply ignore the massive positive job implications of developing renewable energy technologies and increasing energy efficiency. Any business activity that can thrive without fossil fuels is simply discounted. Additionally, the fossil lobby consistently fails to predict the economic losses that would follow from inaction on climate change-for instance, the studies by the insurance industry of mounting losses from climate-related disasters.

As recently as February, 1997, 2000 economists, including six Nobel laureates, signed a statement arguing that the US should join other nations to take measures to slow climate change and agreed that "preventable steps are justified" The economists, who ar from across the political spectrum, argued that: Economic studies have determined that there are many potential policies for which the benefits outweigh the costs. Policy options are available that would slow climate change without harming employment or US living standards, and these may be economically beneficial in the long run."

The last argument deployed by the fossil fuel lobby-that action is pointless in the face of growth in the developing world - is simply a red herring. Firstly, it is obvious to all parties to the climate negotiations that the developing world will postpone action until convinced that the industrialized nations are serious about tackling climate change. International action must start with the West. Secondly, developing nations currently make relatively small per capita contribution of climate change gases and are not responsible for the historic burden of carbon dioxide currently in the atmosphere (which was generated by Western nations during in

dustrialization). So from a pespective of political pragmatism, Equity or simple justice, its seems clear that the industrialised world must take the lead in combating climate change by reducing emissions of greenhouse gases.

**Taking the Gloves Off**

Although the fossil fuel lobbyists sare capable of producing superficially sophisticated arguments about economics and the minutiae of climate change, they are also willing to tackle the dirty business of discrediting opponents and spreading disinformation. Most aggressive among the groups is the GCC, which argued in 1995 that the Inter-Governmental Panel on Climate Change was making a "Political judgement" when stating that there was a discernable human influence on global climate. The GCC then went on accuse the IPCC of " scientific cleansing" in 1996 - claiming that chapter eight of the IPCC 's report had been changed between draft and final version in order to suppress scientific uncertainty and pursue a political agenda. The accusations soon acquired a nasty personal edge with allegations being made against Dr. Santer, the lead editor of chapter eight. The accusations were in fact unfounded and GCC has lost credibility as a result of its tactics. As one climatologist pointed out: "They can't attack the science, so they attack the scientists".

Yet despite the millions of fossil fuel dollars spent lobbying for inaction, the GCC is yet to derail the internations negotiations and is beginning to suffer attacks from senior sources. Timothy With, US Under-Secretary of State for Global Affairs, has dismissed the GCC and the other fossil fuel lobby groups as "naysayers and special interests bent on belittling, attacking and obfuscating climate change science" while 'The New York Times' described the GCC as waging a " systematic campaign of disinformation". And even more troubling than the loss of credibility is the recent defection of two prominent GCC members - BP America and the Arizona Public Service Company - who seemed to find the street-fighting style of GCC ill-tied to their own corporate positions.

But the in-your-face tactics of the GCC are not necessarily a guide to effectiveness and the other key umbrella body, the ICCP, may well prove to be the more damaging in the long term. The ICCP employs a distinctively less aggressive and conformational style in its lobbying but shares exactly the same policy agenda as the GCC and uses considerable cunning and guile to get its own way. The secretive Climate Council is also working hard to ensure that little international action will taken on climate change and can be expected to be active throughout 1997 and beyond.

**Lobbying for a Future**

In contrast to the 'lobbying for lethargy' conducted by the fossil fuel lobby there are alternative business groupings which are actively working for real action to control the gases which cause climate change. These groupings - including the US Business Council for a Sustainable Energy Future (BCSEF) and the European BCSEF - represent industries that will thrive under a tough international regime for controlling greenhouse gases, such as industries working in renewable energy and energy efficiency. There are also lobbyists working on behalf of commercial sectors which believe themselves to be particularly vulnerable to the effects of climate change, especially the insurance and reinsurance industres with their need to assess the frequency of extreme weather events. However, whether these lobby groups can successfully counter the influence of the fossil lobby in 1997, fuelled as it is by millions of dollars, remains an open question.

1997 is a critical year for international negotiations on climate change. It culminates in the conference of Parties in Kyoto in December where binding commitments to targets and timescales for reducing the emissions of climate change gases are meant to be agreed. The fossil fuel lobby will be there in force, as they will be at every preliminary meeting and other international conferences including the Group of 7 Economic Summit in Denver and Earth Summit II in New York. The fossil lobby will argue in the face of scientific consensus that climate change science is flawed, the industrialised world will be bankrupted if it takes action and that the developing world is the major villain. None of these positions are true and the real price of taking no action to combat climate change will be catastrophic for our civilisation, leaving millions dead, homeless or impoverished povenshed Ultimately, the governments of the world must decide whether to allow the suicidally short-term interests of the coal, oil and gas lobby to prevail, or whether a sustainable future based on renewable energy technology is something worth working for. The future of our civilisation is in their hands.

• • •